सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३१४ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# २०३० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती जागतिक स्तरावर साजरी होणार

## शिवनेरीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा; गड–किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा शब्द पूर्ण

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. १९ फेब्रुवारी :** छत्रपती शिवरायांनी दिलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा हा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यावरील अतिक्रमणे हटवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता,तो शब्द सरकारने पूर्ण केला. किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी फडणवीस बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार शरद सोन–वणे, माजी आमदार अतुल बेनके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अभिनेता रितेश देशमुख, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे, विज्ञान कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, भाजप नेत्या आशाताई बुचके आदी उपस्थित होते.





छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज भारताचा इतिहास आणि भूगोलही वेगळा असता असे नमूद करून फडणवीस म्हणाले. अनेक राजे–रजवाडे मोगलांच्या आधिपत्याखाली काम करत असताना आई जिजाऊंनी घडविलेल्या छत्रपती शिवरायांनी रयतेचे स्वराज्य स्थापन करून हिंदुस्थानाला नवी दिशा दिली. छत्रपती शिवरायांनी १८ पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. 'हे माझे राज्य नसून रयतेचे राज्य आहे,' अशी भूमिका त्यांनी घेतली. देव, देश आणि धर्मासाठी लढा देण्याची प्रेरणा देत त्यांनी सामान्य जनतेला मोगलांच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य केले. त्यांच्या राज्यात समता, सन्मान, न्याय आणि स्त्रीसुरक्षा यांना प्राधान्य होते. शेतकरी समाधानी राहील, अन्याय–अत्याचार होणार नाहीत, अशी राज्यव्यवस्था त्यांनी उभी केली, असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यकारभारात विविध सुधारणा करताना शिवाजी महाराजांनी सुमारे ५० प्रकारचे कर रद्द करून सुटसुटीत करप्रणाली निर्माण केली. पाणी, जंगल यांचे नियोजन केले. भविष्यातील धोका ओळखून समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना रोखण्यासाठी जलद–ुर्ग उभारले. पोर्तुगीजांवर विजय मिळवून पश्रि्चम किनारपट्टी सुरक्षित केली. छत्रपतींच्या कारकिर्दीत समुद्रमार्गे आक्रमण करण्याची हिंमत कुणालाही झाली नाही, अशा शब्दात त्यांनी महाराजांचे द्रष्टेपण मांडले.

शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष राज्यातील गड किल्ले देत असल्याचे नमूद करीत फडणवीस पुढे म्हणाले, पंतप्रधानांच्या पुढाकाराने शिवनेरी–सह छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले असून २७ देशांनी एकमताने त्यास मान्यता दिली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी संबंधित प्रमाणपत्र स्वीकारले. त्यामुळे शिवरायांचे किल्ले आता अधिकृतपणे जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरवले गेले आहेत.

शिवरायांच्या कार्याची साक्ष असलेले राज्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. मराठा सेवा संघाच्या निवेदनावर राज्य सरकार सकारात्मक काम करेल, तसेच मांडण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांवर विचार करण्यात येईल, अशी ग्वाही देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यातील आणि जगभरातील शिवप्रेमींना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळ–णा गायिला. राष्ट्रगीत तसेच 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताची धून पोलीस बँड पथकाने वाजवून सलामी दिली. त्यानंतर पोलीस पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली. यावेळी जिल्हा परिषद शाळच्या लहान विद्यार्थ्यांच्या पथकाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंग सुंदर पद्धती–ने सादर केले. त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बाल शिव–ाजी व जिजाऊ आईसाहेब यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पालखी वाहीली.

यावेळी मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रगत प्रगतशील शेतकरी स्व. पंकज वामन, खारखर येथील टाटा कॅन्सर रुग्णालयाचे विभाग प्रमुख डॉ. विन–ोद सीताराम हांडे, लेफ्टनंट अजिंक्य मेहेर, माजी पंचायत समिती सभापती शिवाजीराव खैरे आणि उपलेफ्टनंट श्रुतिका ताथवडे यांना शिवनेर भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, तहसीलदार सु–नील शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील मराठा सेवा संघाचे पदाधिकारी यांच्यासह शिवभक्त उपस्थित होते.

# फेब्रुवारीतच महाराष्ट्र तापला

## पुढील २४ तासांत पारा आणखी वाढणार



**तभा वृत्तसेवा**

**नागपूर, दि. १९ फेब्रुवारी :** फेब्रुवारीच्या मध्यावर येताच महाराष्ट्रातील हवामान अधिक कोरडे आणि कडक होत चालले आहे. थंडीची चाहूल जवळजवळ संपुष्टात आली असून दुपारच्या उन्हाने आप–ली ताकद दाखवण्यास सुरुवात केली आहे. पुढील २४ तासांत तापमानात पुन्हा वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

गेल्या काही दिवसांत राज्यातील अनेक भागांत कमाल तापमान ३७ अंशांच्या पुढे गेले आहे. सकाळी थोडाफार गारवा जाणवत असला तरी दुपारपर्यंत वातावरणात उष्णतेची लाट स्पष्टपणे जाणवते. दुपारी घराबाहेर पाय ठेवणे देखील कठीण होत चालले आहे. विदर्भात एरवीही उन्हाळ्यात तापमानाचा पारा चढलेला असतो. मार्च महिन्यात कमाल तापमानाने ४५ अंशापेक्षाही अधिक पाऱ्याची नोंद झाली आहे. चंद्रपूर, नागपूर, अकोला या शहरांमध्ये उन्हाळ्यात तापमानाचे उच्चांक नोंदवले आहेत. यावेळी लवकर सुरु झालेला उन्ह–ाळा पाहता यावर्षी देखील तापमानाचे उच्चांक नोंदवले जातील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

१९ फेब्रुवारीला देखील राज्यातील बहुतांश भागांत कोरडे आणि उन्हाळी स्वरूपाचे हवामान कायम राहील. मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि कोकण किनारपट्टीत उष्णतेसोबत दमटपणाही जाण–वेल. मुंबईत कमाल तापमान ३४ ते ३६ अंशांदरम्यान राहण्याचा अंदाज असून किमान तापमान २२ ते २४ अंशांच्या आसपास नोंदवले जाईल. आर्द्रतेमुळे दुपारच्या सुमारास उकाडा अधिक चटका देणारा ठरेल. सकाळ–संध्याकाळ वातावरण तु–लनेने सौम्य असले तरी समुद्रकिनारी भागात दुपारचे ऊन तीव्र भासेल. पश्रि्चम महाराष्ट्रात सकाळी हलका गारवा जाणवेल, मात्र तो अल्पकाळ टिकेल. दुपारी कमाल तापमान ३५ ते ३७ अंशांपर्यंत झेपावेल. मोकळ्या, कोरड्या प्रदेशात उन्हाची तीव्रता अधिक जाणवण्याची शक्यता आहे. संध्याकाळी तापमानात थोडी घट होईल; तरी दिवसभर उष्णतेचा प्रभाव कायम राहील. विदर्भ आणि मराठवाडा हे भाग सर्वाधिक तापमान नोंदवणारे ठरतील. मराठवाड्यात कमाल तापमान ३६ ते ३८ अंशांदरम्यान, तर विदर्भात काही ठिकाणी ते ३८ ते ३९ अंशांपर्यंत पोहोचू शकते. किमान तापमान अनुक्रमे १६ ते १९ आणि १८ ते २१ अंशांच्या दरम्यान राहील.

दुपारच्या वेळेत कडक ऊन आणि कोरडे वारे यांचा संगम जाण–वेल. एकूणच, राज्यात उन्हाचा पारा हळूहळू वर चढत असून पुढील काही दिवसांत सकाळचा गारवा आणखी कमी होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे दुपारच्या वेळेत बाहेर पडताना डोक्यावर संरक्षण, पुरेसे पाणी आणि हलके, सैलसर कपडे यांचा वापर करण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.





10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | BAJAJ AUTO CREDIT | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans

*नियम आणि अटी लागू. बचत 28 फेब्रुवारी 2026 पर्यंत उपलब्ध. दाखवलेली एकूण बचत ही कॅशबॅकची बचत, शून्य प्रोसेसिंग फी आणि 5 मोफत सर्व्हिसेस (3 स्टँडर्ड मोफत सर्व्हिसेस आणि 2 अतिरिक्त मोफत सर्व्हिसेस) यांची बेरिज आहे. मोफत सर्व्हिसेसची बचत शेड्यूल्ड लेबर शुल्कानुसार. लागू ऑफर्स मॉडेल्स/राज्यानुसार बदलू शकतात. शून्य पीएफवरील बचत फायनान्सर आधारावर स्थानांनुसार बदलू शकते. अर्थपुरवठा पूर्णपणे फायनान्सरच्या विवेकानुसार. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे. पल्सार 125 ऑफर ही निऑन आणि कार्बन फायबर मॉडेल्सवर.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd Aurangabad** • **Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 9168601253 • **Shendra ASHOK BAJAJ 8380025694**• **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Beed** SWASTIK BAJAJ 9226765488, **Parli** SWASTIK BAJAJ 8830855581 • **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906 • **Latur** RAJYOG BAJAJ 9168775077 • **Udgir** RAJYOG BAJAJ 8329643399 •**Ahmedpur** 8149565419 • **Nanded** UJWAL BAJAJ 7770018779 ,Gangotri Bajaj 9765665222, • **Loha** 9834524366 • **Hingoli SAI SHAM BAJAJ** 8766819162• **Parbhani** MUTHA BAJAJ 7447241490• **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ 8929643158 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Osmanabad Raghuveer Bajaj** 9132113211 • **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भोसले गढीवर जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**खुलताबाद, दि. १९ फेब्रुवारी :** वेरूळ येथे जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने शिवजयंती उत्साहात साजरी अठरापगड जातीला सोबत घेऊन रयतेचे कल्याणकारी राज्य निर्माण करणाऱ्या छत्रपती शिवरायांचा जन्मोत्सव आज मा साहेब जिजाऊ आणि शहाजीराजे महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या वेरूळ येथील भोसले गढीवर जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराज यांचे उत्तराधिकारी स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाने जन्मोत्सव सोहळा संपन्न झाला.

हे दुसरे वर्ष आहे याप्रसंगी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्रजी पवार ,बाबाजींच्या वतीने स्वामी विवेकानंदजी महाराज,जिल्हा परिषद सदस्य तथा घृष्णेश्र्वर मंदिराचे अध्यक्ष विकीजी दांडगे तसेच पंचायत समिती सदस्य भरडे दयानंद पाटील, सागर मातकर ,शेकनाथ दादा होळकर, जगन्नाथ उगले, महेश निराळी, राजूभाऊ चव्हाण, संजय गायकवाड, आप्पाराव नागे तथा



बाबाजींच्या विद्यालयातील विद्यार्थी शिक्षक वृंद असंख्य शिवभक्त यांच्या उपस्थितीमध्ये स्वराज्य संकल्पक शहाजीराजे महाराज छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले याप्रसंगी बाबाजींच्या आश्रमातून ढोल ताशांच्या गजरात लेझीम पथका सहित वाजत गाजत शिवछत्रपतींच्या मूर्तींची भव्य शोभायात्रा पवित्र भोसले गढी पर्यंत काढण्यात आली माता भगिनींच्या वतीने भव्य रांगोळी सुद्धा स्मारकाच्या भोवती काढली होती, याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्रजी पवार यांनी प्रास्ताविक पर भाषणत मालोजीराजे भोसले यांच्या पवित्र भूमीचे महत्त्व समजून सांगितले भोसले घराण्याचा उगम येथे झालेला आहे म्हणूनच या जागेला अनन्यसाधारण महत्त्व आहे पराक्रमाची साक्ष देणारी ही भूमी आणि अठरापगड जातीला सोबत घेऊन राष्ट्रगाडा चालवण्याचा संस्कार देणारी ही भूमी असल्यामुळे या भूमीचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे म्हणूनच शिवजयंती उत्सव, शिवराज्याभिषेक सोहळा आणि १८ मार्च ची शहाजीराजे महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात येथे करण्याचा संकल्प आम्ही घेतलेला आहे शहाजी महाराजांचा वारसा सर्वांपर्यंत पोहोचावा एवढ्याच उद्देशासाठी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानची निर्मिती मी सहकाऱ्यांच्या सोबत केलेली आहे तरी या शिवजन्मोत्सव प्रसंगिनी सर्व शिवभक्तांना आव्हान करतो की घढीवर होणाऱ्या प्रत्येक उत्सवामध्ये आपण सहभागी व्हावे ही विनंती राजेंद्र पवार यांनी महाराष्ट्रातील सर्व शिवभक्तांना केली यानंतर बाबाजींच्या वतीने विवेकानंद महाराजांनी सर्व शिवभक्तांना शुभेच्छा दिल्या व बाबाजींच्या पुढाकारातून गढीवर सुरू झालेल्या शिवजन्मोत्सवाला आगामी काळामध्ये भव्य दिव्य स्वरूप दिले जाईल आणि सर्व शिवभक्तांना सुद्धा भोसले गढी वरती उत्सवासाठी उपस्थित राहावे आणि शिव विचाराचा प्रचार प्रसार करावा असे आव्हान बाबाजींच्या वतीने विवेकानंद महाराजांनी केले आहे आलेल्या शिवभक्तांचे राजेंद्र पवार यांनी आभार मानले.

## थोडक्यात...

### ‘जगद्धात्री’चे प्रेक्षकांकडून कौतुक

**छत्रपती संभाजीनगर :** जगद्धात्री मालिकेतील शिवाय आणि जगद्धात्री या लोकप्रिय डहर्ळीवहरींळ जोडीवर चित्रीत करण्यात आलेले ‘हर जनम’ हे नवीन रोमँटिक गाणे नुकतेच प्रदर्शित झाले असून प्रेक्षकांकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सोनाक्षी बत्रा आणि फर्मान हैदर यांनी या गाण्याला चित्रपटातील प्रेमगीताइतकी भव्यता असल्याचे सांगितले. या गाण्यातून शिवायचे जगद्धात्रीवरील निस्वार्थ प्रेम प्रभावीपणे मांडण्यात आले आहे. तीन दिवस विविध ठिकाणी या गाण्याचे सिनेमॅटिक धाटणीचे चित्रीकरण करण्यात आले. मालिकेच्या सध्याच्या कथानकात खोट्या लग्नातून निर्माण होणारे भावनिक नाते आणि सत्यशोधाचा प्रवास प्रेक्षकांची उत्सुकता वाढवत आहे. ‘जगद्धात्री’ दररोज रात्री १० वाजता झी टीव्ही वर प्रसारित होते.

### मुंबई-नाशिक महामार्गावर अल्ट्रा-फास्ट ईव्ही चार्जिंग स्टेशन लाँच

**नाशिक :** स्वीडिश लक्झरी कार ब्रँड व्होल्वो कार इंडिया आणि भारतातील सर्वात मोठे ईव्ही चार्जिंग नेटवर्क चार्जझोनएँ यांनी आज मुंबई-नाशिक महामार्गावर अल्ट्रा-फास्ट चार्जिंग स्टेशनचे उद्घाटन केले. या चार्जिंग स्टेशनमध्ये ३६० केडब्ल्यू स्टार चार्ज पॉवर युनिटसह दोन डायनॅमिक लोड बॅलन्सिंग डिस्पेन्सर्स आहेत. हे चार्जिंग स्टेशन इगतपुरीजवळ मुंबई-नाशिक महामार्गावरील फूड हिल्स येथे स्थित आहे. हे उद्घाटन देशभरात प्रीमियम सुपरचार्जिंग नेटवर्क उभारण्यासाठी त्यांच्या सहयोगामधील महत्त्वपूर्ण टप्पा आहे.हे इंटेलिजण्ट कॉन्फिग्युरेशन व्होल्वो ग्राहक आणि इतर ईव्ही वापरकर्त्यांना सानुकूल ऊर्जा वितरण, कमी प्रतिक्षा कालावधी व वास्तविक विश्र्वामध्ये जलद चार्जिंग अनुभव देते. महाराष्ट्रातील सर्वात वर्दळीच्या इंटरसिटी मार्गावर धोरणात्मकरित्या स्थित या चार्जिंग स्टेशनमध्ये व्होल्वो ईव्हींसाठी समर्पित बे आहेत. तसेच ॲपमध्ये नेव्हिगेशन व पेमेंट्स सुविधा मिळतात. अशा सोयीसुविधा व विश्र्वसनीयतेसह ग्राहकांना उत्साहवर्धक अनुभव मिळतो.

### आयपीटेक्स आणि ग्राइंडेक्स २०२६

**छत्रपती संभाजीनगर :** पॉवर ट्रान्समिशन, प्रिसीजन ग्राइंडिंग आणि गिअर उत्पादन तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आयपीटेक्स आणि ग्राइंडेक्स २०२६ हे २६ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान पुण्यातील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित करण्यात येणार आहे. अमेरिकन गिअर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (AGM) यांच्या पाठबळासह होणाऱ्या या प्रदर्शनाचे उद्घाटन नामवंत औद्योगिक नेत्यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी अधिक माहिती देताना श्री. रघुनाथ जी., संचालक, व्हर्गो कम्युनिकेशन्स अँड एक्झिबिशन्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणाले, आयपीटेक्स आणि ग्राइंडेक्स २०२६ हे गिअर आणि पॉवर ट्रान्समिशन मूल्यसाखळीतील सर्व घटकांना एकत्र आणणारे संपूर्ण व्यासपीठ आहे. गिअर कटिंग व ग्राइंडिंग मशिन्स, टूलिंग, मेट्रोलॉजी, फिनिशिंग, ऑटोमेशन आणि कंट्रोल सिस्टीम्सपर्यंत उद्योगाचे ३६० अंश दृश्य येथे अनुभवता येईल.

### कै.बाबुरावजी काळे स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी



**सोयगाव :** येथील कै.बाबुरावजी काळे स्कूल येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रा.निलेश पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी ज्ञानेश्र्वर एलिस,योगेश काळे,सागर घाटे,उमेश जाधव,अंजली कथलकर,मनिषा पाटील, रुपाली मानकर,जयश्री श्रीवास्तव,विद्या पाटील,आशा गणगे,उषा ढेपले,अरुण भोई,नलिनी पाटील,रंजना जाधव, संजय डापके, ज्ञानेश्वर पंडित,सुनीता जाधव,रुख्मिणी नेरपगार,आदी उपस्थित होते.

०००००००००००००००००००००००००००००००००००



सुदर्शन सौर ऊर्जा चे संचालक संजय बारगजे यांनी शिवजयंतीनिमित्त वृक्षारोपण केले. या वेळी अमोल सोमवंशी हे उपस्थित होते



छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा ऐतिहासिक वेष परिधान करत स्वराज्याच्या प्रेरणादायी वारशाला अभिवादन केले.

## विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये ३९६ वी शिवजयंती उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**बिडकीन दि. १९ फेब्रुवारी :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये ३९६ वी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी शिवरायांना अभिवादन केले. मनोगत व्यक्त करताना सतीश तोतला व सविता तोतला यांनी विद्यार्थ्यांना शिवचरित्रातून प्रेरणा घेऊन धैर्य, शौर्य आणि राष्ट्रप्रेम जोपासण्याचे आवाहन केले. तसेच राजमाता जिजाऊ यांच्या संस्कारांचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ आदी ऐतिहासिक व्यक्तीरेखांची वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधले. इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी भाषणे, नृत्य तसेच शिवगर्जना सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका वर्षा चव्हाण व शिक्षक कृष्णा भालेराव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात दोन ट्रक मध्ये अपघात

**फर्दापूर :** बुधवारी संध्याकाळी सहा वाजता अजिंठा घाटात दोन ट्रक जळगाव दिशेने घाटात उतरत असताना एका ट्रकचे ब्रेक फेल झाले असल्याने तो ट्रक दुसऱ्या ट्रक वर धडकला असल्याने दोन्ही ट्रक रस्त्यात मधोमध उभे असल्याने घाटात ट्राफीक जाम झाला होता या दोन्ही ट्रक जीजे १२ बिटि ५२८४ व दुसरा ट्रक एच पी १२ पी ७६९५ हे दोन्ही ट्रक जळगाव दिशेने माल घेऊन जात असताना एका ट्रकचे ब्रेक निकामी झाले असल्याने तो ट्रक दुसऱ्या ट्रक ला धडकला असल्याने घाटात दोन तास ट्रॅफिक जाम झाली होती यावेळी फर्दापूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी संतोष उबाळे यांनी घाटातील अडचणी दूर करण्यात आली. यावेळी काही छोट्या गाड्या सोयगाव हळदा मार्ग जात होत्या तसेच यामध्ये रुग्ण वाहिका तसेच प्रवाशी, पर्यटक यांची मोठ्या प्रमाणात तारांबळ उडाली त्यामध्ये रात्री ची आणि घाटात पुर्णपणे अंधार यामुळे यांच्या मध्ये मोठ्या भिंती दिसत होती.

## डॉ.प्रकाश पापड़ीवाल याना एस एल एस लाईफ टाईम अचिव्हमेंट अवॉर्ड प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती सभाजीनगर, दि. १९ फेब्रुवारी :** सोसायटी ऑफ लाईफ सायन्सेस तर्फे एस एल एस लाईफ टाईम अचिव्हमेंट अवॉर्ड २०२६ प्रा. प्रकाश बाबूलाल पापडीवाल माजी प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, यांना जीव विज्ञान, विशेषतः वनस्पतीशास्त्र, क्षेत्रातील त्यांच्या दीर्घकालीन, उल्लेखनीय शैक्षणिक योगदान व संशोधन कार्याबद्दल सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागात पार पडलेल्या राष्ट्रीय परिषदेत हा सम्मान सोसायटीचे सरचिटणीस प्रा.शिवेश प्रताप सिंग यांचे द्वारा करण्यात आला. या प्रसंगी त्या सोसायटीच्या पुरस्कार समिती चे अध्यक्ष डॉ.निरज कुमार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे रसायन तंत्रज्ञान विभाग प्रमुख प्रा.भगवान साखळे, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनिता बोर्डे, प्रा.जी.डी.खेडकर, प्रा.आर. पी.चोंडेकर,प्राचार्य राम चव्हाण, राष्ट्रीय परिषदेत सहभागी झालेले प्रतिनिधी, विभागातील विध्यार्थी आदी बहुसंख्येने उपस्थित होते.



## पहिले अखिल भारतीय वैद्यकीय साहित्य संस्कृती संमेलन संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती सभाजीनगर, दि. १९ फेब्रुवारी :** इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे पहिले अखिल भारतीय वैद्यकीय साहित्य संस्कृती संमेलन व ‘नवरत्न सन्मान’ सोहळा उत्साहात पार पडला. अध्यक्ष डॉ. अनूपम टाकळकर यांच्या नेतृत्वाखाली शाखेने मूल्याधिष्ठित आणि समाजाभिमुख उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करत वैद्यकीय क्षेत्राला व्यापक सामाजिक संदर्भ देण्याचा प्रयत्न केला. आओ गाव चले आणि आय एम ए कनेक्ट उपक्रमांतर्गत ग्रामीण भागात आरोग्य तपासण्या, घंटागाडी कामगार व महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांची कार्यस्थळी तपासणी, बसस्थानक परिसरात वैद्यकीय सल्ला तसेच आशा कार्यकर्त्यांसाठी ताण व्यवस्थापन सत्रांचे आयोजन करण्यात आले.

संमेलनात वैद्यकीय क्षेत्रात आयुष्यभर निःस्वार्थ सेवा देणाऱ्या ज्येष्ठ डॉक्टरांचा गौरव करण्यात आला. पद्मश्री डॉ. हिम्मतराव बाविस्कर यांनी विंचूदंशावरील उपचारपद्धतीत संशोधनाद्वारे मृत्यूदर लक्षणीयरीत्या कमी केला. डॉ. राजेंद्र मालोसे यांनी ‘कोरोनायन’मधून कोविड काळातील अनुभव नोंदवले. डॉ. दिलीप पुंडे यांनी सर्पदंशावरील हजारो रुग्णांना जीवदान दिले. डॉ. अशोक बेलखोडे यांनी किनवट येथे साने गुरुजी रुग्णालय उभारून दुर्गम भागात सेवा दिली.

पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांनी रेटिना शस्त्रक्रिया व नेत्रशिबिरांतून उल्लेखनीय कार्य केले. डॉ. भागवत कराड यांनी बालरोग शल्यचिकित्सा व सार्वजनिक जीवनात योगदान दिले. डॉ. अशोक कुकडे यांनी लातूर भूकंपकाळात आरोग्य नेतृत्व केले. डॉ. बालाजी गलधर यांनी उद्योग उभारून रोजगारनिर्मिती साधली, तर डॉ. अश्र्विनीकुमार तुपकरी यांनी ‘सेवांकुर भारत’द्वारे समाजाभिमुख वैद्यकीय चळवळ उभी केली. संमेलनातून वैद्यकीय साहित्यिक अभिव्यक्तीला राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध झाले.

## बिडकीन येथील ब्लु माउंटेन प्री-स्कूलमध्ये ३९६ वी शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बिडकीन, दि. १९ फेब्रुवारी :** पराक्रम, शौर्य आणि स्वाभिमानाचे ज्वलंत प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी देशभर साजरी केली जाते. ३९६ वी शिवजयंती पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु माउंटेन प्री-स्कूलमध्ये अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संस्थापक अध्यक्ष. सतीश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.



यावेळी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थापक अध्यक्ष. सतीश तोतला म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची स्थापना करून स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित केली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या धैर्य, शिस्त आणि नेतृत्वगुणांचा आदर्श घ्यावा. तसेच मुख्याध्यापिका सविता तोतला म्हणाल्या, शिवरायांचे जीवन प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनी प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ नागरिक बनण्याचा संकल्प करावा.

कार्यक्रमात शिक्षिका रेखा चव्हाण यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर भाषण केले. विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत येऊन सर्वांचे लक्ष वेधले. नर्सरी, ज्युनियर केजी आणि सिनियर केजीच्या विद्यार्थ्यांनी भाषणे, नृत्य, नाटिका आणि शिवगर्जना सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका ज्योती राठोड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षिका ज्योती राठोड, मनीषा जाधव, प्रतीक्षा पोटे, रेखा चव्हाण, कविता मढीकर, नंदिनी चव्हाण तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

जा.क्र./जे-३/ 699 /२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
दि. ०६/०२/२०२६

**चौकशीची जाहीर नोटीस**

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय. छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर,**
**चौकशी अर्ज क्रमांक :- जे-३/२०/२०२६ - कलम :- १९**

न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक: "इंगल आय फाऊंडेशन, छत्रपती संभाजीनगर, बाबत...
अर्जदार :- वेदांत लक्ष्मण गरुड

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, सहाय्यक धर्मादाय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वत व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुददयावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाच्या मालकीची आहे काय?
अ) जंगम मालमत्ता (वर्णन) रुपये- ७००७/-. ब) स्थावर मिळकत (वर्णन) काही नाही.

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयात वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी दिली असे.

स्वाक्षरीत/-
न्यायशाखा (अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय छत्रपती संभाजीनगर.

जावक क्रमांका 834/2026
सार्वजनिक न्यास नांदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,
बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर
दि. 13 FEB 2026

**चौकशीची जाहीर नोटीस**

एस.आर.एन. क्रमांक: ARN/01187/18/25
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक..
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक सेवा संस्कार फाउंडेशन छत्रपती संभाजीनगर बाबत ।
न्यासाचा पत्ता : एन-11 ए-51/1, सुदर्शन नगर, छत्रपती संभाजीनगर, औरंगाबाद, औरंगाबाद
अर्जदार : किरण नारायणराव खरात,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 चे कलम 19 अन्वये खालील मुद्रांवर चौकशी करणार आहेतः-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand in possession of president | 3000.00 |

(अ) जंगम मिळकतः रोख रु. 3000/- मात्र
(अक्षरी रुपये तीन हजार मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा नहानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकतः रोख रु. मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक 13-02-2026 रोजी दिली.

स्वाक्षरीत/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय छत्रपती संभाजीनगर

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सरस्वती महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत, स्फूर्तीस्थान, महापराक्रमी राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ राम बोरगावकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## विविध वृत्त...

### सिध्देश्वर कोलेज ऑफ फार्मसीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



**लातूर :** सिध्देश्वर कोलेज ऑफ फार्मसीत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक रयतेचे राजे शौर्य धैर्य आणि न्यायाचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि ती मी मिळवणारच त्यांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि आदर्श राज्यकारभारातून आपण प्रेरणा घेऊ या. धर्मनिसेक्षता स्त्रीसन्मान शौर्य याणि स्वाभिमान यांची शिकवण देणारे' शिवरायांचे विचार जीवणात रुजवूया. जय शिवराय. जय शिवाजी. अशी माहिती आयुष गुंजरगे यांनी सांगितली. तसेच नवीन चव्हाण याने शिवाजी महाराजांचा पोवाडा गायिका. अशा प्रकारे महाविद्यालयात शिव जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ शामलीला बावगे मॅडम, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण



**लातूर :** शिवजयंतीनिमित्त जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झालेल्या या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सर्व उपस्थितांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

### इयत्ता दहावीच्या परीक्षांना आजपासून सुरुवात; कॉपीमुक्त परीक्षेसाठी प्रशासनाकडून उपाययोजना

**लातूर :**जिल्ह्यात आजपासून इयत्ता दहावीच्या परीक्षेस प्रारंभ होत असून कॉपीमुक्त परीक्षेसाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. परीक्षा केंद्रावर अचानकपणे भेट देण्यासाठी भरारी पथकाची व कायमस्वरूपी बैठे पथकाची व्यवस्था करण्यात आली असून, कॉपी मुक्त वातावरणात परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने आवश्यक दक्षता घेतली आहे. जिल्ह्यातील १५२ परीक्षा केंद्रावर २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या काळात इयत्ता दहावीची परीक्षा होणार आहे. लातूर जिल्ह्यातून ३९ हजार २४२ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. प्रत्येक विषयाच्या पेपरसाठी १५२ केंद्रासाठी महसूल विभाग, ग्रामविकास विभाग आणि इतर विभागांच्या समन्वयातून १५२ त्रिसदस्यीय बैठी पथके गठीत करण्यात आली आहेत, ती रोटेशन पद्धतीने कार्यान्वित ठेवण्यात येणार आहेत. ही पथके पूर्ण वेळ कार्यरत राहणार आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या मागर्दर्शनाखाली तयार करण्यात आलेली महसूल अधिकारी, जिल्ह्यातील सर्व खातेप्रमुख यांची ७० भरारी पथके परीक्षा कालावधीत विविध परीक्षा केंद्रांना अचानक भेट देवून पाहणी करतील. परीक्षा कालावधीत सर्व परीक्षा केंद्रावर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आलेले आहेत.

### बाभळगाव महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

**लातूर :** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. संदिपान चेवले यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रा.शिल्पा हलसीकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दुष्यंत कटारे होते. प्रा. हलसीकर यांनी मार्गदर्शन करताना असे म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते उत्कृष्ट प्रशासक, लोककल्याणाचा ध्यास घेतलेले दूरदृष्टीचे नेतृत्व होते. त्यांनी स्वराज्य उभारताना न्याय, समानता आणि शिस्त या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले. आजच्या विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनातून आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम आणि समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा घ्यावी. शिक्षणाच्या बळावर स्वतःचा आणि देशाचा विकास साधणे, हाच शिवविचार खऱ्या अर्थाने जपण्याचा मार्ग आहे. अध्यक्ष समारोपामध्ये प्राचार्यांनी आपल्या मनोगतात छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्वगुण, प्रशासनकौशल्य आणि आदर्श मूल्ये आजच्या तरुणाईसाठी मार्गदर्शक असल्याचे नमूद केले.

# हजारोंच्या साक्षीने झुलला बाळ शिवबांचा पाळणा

## शाहीरांनी जागवले चैतन्य, शिवभक्तीला उधाण, मनपा आयुक्तांसह अनेकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** भगव्या पताका, विद्यूत रोषणाईचा झगमगाट, फटाक्यांचा कडकडाट, मराठमोळ्या पेहरावात भगवे फेटे बांधून आलेल्या माता- भगिणी अन शिवरायांचा अखंड जयकार अशा उत्साही वातावरणात लातुरकरांनी बुधवारी (दि.१८) शिवजन्माचे स्वागत केले.







मध्यरात्री लातूर शहर महापालिका आयुक्त मानसी, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, एसडीएम रोहिणी नर्हे विरोळे व अन्य महिलांनी बाळ शिवबांचा पाळणा झुलवला अन सारा परिसर पुन्हा शिवरायांच्या गगनभेदी जयकाराने निनादून गेला. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, उपविभागीय पोलिस अधिकारी समिरसिंह साळवे, पोलिस निरीक्षक सुधाकर बावकर, अभिषेक शिंदे, सावर्जनिक शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, हंसराज जाधव, विशाल जाधव, डी.एस. पाटील, वैजनाथ जाधव, धनंजय शेळके,नेहरू देशमुख, अविनाश पाटील, डॉ.रमेश भराटे, डॉ. अभय कदम, डॉ. अमित पाटील, हॉस्टेल असोचे विजय जाधव, दत्तात्रय जाधव, विजय गवळी, नितीन पवार, अॅड. शिवकुमार जाधव, अॅड. विजय जाधव,सुंदर पाटील, अभिमन्यू जगदाळे आदींसह अनेकांची उपस्थिती होती. पाळणा उत्सवाचे व्यापक नियोजन करण्यात आले होते. भव्य मंच उभारण्यात आला होता. रात्री ८ वाजेपासूनच महिला, विद्यार्थीनी तसेच नागरीकांनी कार्यक्रमस्थळी येण्यास रांगा लावल्या होत्या. सारा चौक शिवप्रेमींनी गजबजला होता. महिला व मुलींची संख्या लक्षणीय होती.जीजाऊंच्या वेशभूपेत अनेक महिला आल्या होत्या. समितीच्या वतीने सर्वांचेच भगवे फेटे बांधून स्वागत करण्यात येत होते. दरम्यान रात्री ९ वाजता मान्यवरांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करुन दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रध्दासुमने वाहण्यात आली. त्यानंतर जीजाऊ वंदना व महाराष्ट्र गितीने डॉ. निशीगंधा व त्यांच्या संचाने कार्यक्रमास सुरुवात केली.

वीर मावळ्यांची शिवभक्ती, शक्ती व युक्तीचे गुणगाण करणारी गीते अन पोवाडे सुरू झाले. शाहीर साबळेंच्या महाराष्ट्र गिताने, डफावरील थापेने, तुतार्यांच्या निनादने, उपस्थितांना शिवभक्तीचे भरते आले होते अवघे वातावरण शिवमय झाले होते. रात्री पावनेबाराच्या सुमारास मनपा आयुक्त मानसी, एसपी अमोल तांबे, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ व अन्य मान्यवर आले. सर्वांचे स्वागत करण्यात आले अन त्यानंतर पाळणा झाला. फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. साखर वाटून या उत्सवाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन डॉ. रोहीणी सुर्यवंशी यांनी केले. आभार डी.एस. पाटील यांनी मानले.

## शिवरायांच्या विचारांना कृतीतून सलाम आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन ची मागील सहा वर्षांची हरित परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत 'आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन' तर्फे सलग सातव्या वर्षी वृक्षारोपण आणि जनजागृतीचा आगळावेगळा उपक्रम उत्साहात पार पडला. वृक्ष दिंडी, जनप्रबोधन आणि वृक्षसंवर्धनाच्या माध्यमातून साजरी करण्यात आलेली ही शिवजयंती सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरली. या उपक्रमाद्वारे संस्थेच्या कार्याचा अखंड २४५६ वा दिवस शिवरायांच्या चरणी अर्पण करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ स्वराज्याचे संस्थापक नव्हते, तर दूरदृष्टी असलेले पर्यावरण रक्षक राजे होते. स्वराज्य उभारताना त्यांनी वृक्षसंवर्धनाला विशेष महत्त्व दिले होते. आज्ञापत्राद्वारे झाडे लावणे, त्यांचे संगोपन करणे आणि वृक्षतोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले होते. निसर्ग समतोल आणि शाश्र्वत विकासाचा हा विचार आजही प्रेरणादायी ठरत असून त्याच विचारांची अंमलबजावणी करण्याचा संकल्प आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन सातत्याने करत आहे.

शिवजयंतीनिमित्त मागील आठवड्याभरात संस्थेच्या सदस्यांनी शहरात ६५० नागचाफा वृक्षांची लागवड केली. तसेच आज दयानंद गेट टॅक्सी पॉईंट परिसर आणि स्मृती वृक्षांना टँकरद्वारे मुबलक पाणी देत वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही पार पाडली. यानंतर केशरी फेटे, भगवे झेंडे, जनप्रबोधनाची पत्रके आणि रोपे हातात घेऊन शिस्तबद्ध वृक्ष दिंडी काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवरायांना अभिवादन करून उपस्थित नागरिकांना फुलझाडांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनचे डॉ. पवन लड्डा यांनी या उपक्रमासाठी तन-मन-धनाने सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा संकल्प यापुढेही अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## JADE Global Inc. आंतरराष्ट्रीय सॉफ्टवेअर कंपनी च्या कॅम्पस ड्राईव्ह मध्ये दयानंद शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** लातूर येथील दयानंद एज्युकेशन सोसायटीतर्फे दयानंद वाणिज्य महाविद्यालयात JADE Global या सॉफ्टवेअर कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह कार्यक्रम मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला होता. या निवड प्रक्रियेत महाविद्यालयाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातील कु. ऋतुजा असलकर आणि कु. शिवानी हंचाटे या विद्यार्थिनींची निवड करण्यात आली आहे.

या निवडी अंतर्गत विद्यार्थ्यांना गरवश ऋश्रेलरश्र खपल. या आंतरराष्ट्रीय कंपनी मध्ये नोकरी सोबतच इखढड झळश्ररपळ या नामांकित अश्या शिक्षण संस्थेमधून त्यांचे पुढील शिक्षण (M.Tech व M.Sc) पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात. अश्या एकात्मिक कार्यक्रम च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन करत भविष्यातील योजनांसाठी तयार करण्यात येईल या साठी Jade Global Inc. कंपनीने पुढाकार घेतला आहे. या निवड संदर्भात शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्य सोनवणे, कोषाध्यक्ष संजय बोरा, डॉ. जे. एस. दरगड (ADO), प्राचार्य डॉ.माणिकर, शिक्षण संस्थेचे टीपीओ श्री.अनिल बिरादार, बीसीए विभागप्रमुख डॉ. स्वामी व सहाय्यक प्राध्यापक डी. जे. शेख तसेच सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकवृंद यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. जे. ए. महावरकर, सुहाना शेख, एस. चिकटे, एन. एस. कुरे व के. डी. औसेकर यांनी विशेष योगदान दिले.

## जेईई मेन्स परीक्षेत राजमाता जिजामाता महाविद्यालयाचे यश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** राष्ट्रीय पातळीवरील आयआयटी व एनआयटी अशा प्रतिष्ठित अभियांत्रिकी कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी घेण्यात आलेल्या जेईई मेन्स या पहिल्या फेजच्या परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला आहे. या परीक्षेत राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

सोनाली शरद पंचगल्ले ही विद्यार्थिनी ९४.०८ पर्सेंटाइल मार्क मिळवून महाविद्यालयात प्रथम, अनिकेत अशोक मस्के ९१.८७ पर्सेंटाइल मार्क मिळवून द्वितीय, तर विवेक मुकुंद भोसले हा विद्यार्थी ९१.४७ पर्सेंटाइल मार्क मिळवत तृतीय आला आहे. या परीक्षेत प्रथमेश कैलास नागरगोजे याने ९१.०७, सौम्या सौदागर काटे ८७, व्यंकटेश विजयकुमार लड्डा ८४.१८, साईप्रसाद मन्मथ हिंगमिरे ८१.३५, केदार सोमनाथ समशेट्टे ८० तर कृष्णा विजयकुमार किसवे याने ७० पर्सेंटाइल मार्क मिळवत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल आमदार विक्रम काळे, शिक्षण उपसंचालक दत्तात्रय मठपती, सहसंचालक संजय पंचगल्ले, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, मुख्याध्यापक संघटनेचे माजी राज्य अध्यक्ष वसंतराव पाटील, मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्रा. बी. बी. खटके, प्रा. ए. एस. खोत, प्रा. ए. व्ही. क्षीरसागर, प्रा. डी. ए. फंड, प्रा. वैशाली पाटील, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर, बालाजी चाटे यांनी कौतुक केले आहे.

# गनचुंबी रहाटपाळण्यांसह जलपरी शो जिंकणार लातूरकरांची मने

## देश-विदेशातील आकर्षक अमेझॉन पार्क करणार सिद्धेश्वर-रत्नेश्वर यात्रा महोत्सवाचा आनंद द्विगुणित

**तभा वृत्तसेवा/प्रमोद सुरवसे**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर-रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवात देश - विदेशातील आकर्षक अमेझॉन पार्क यात्रा महोत्सवाचा आनंद द्विगुणित करणार असून गगनचुंबी रहाटपाळण्यांसह जलपरी शो सर्वच वयोगटातील नागरिकांची मने जिंकून घेणार असल्याचा विश्र्वास अमेझॉन पार्कच्या मुख्य आयोजकांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला.





विविध यात्रा महोत्सवात नागरिकांसाठी आकर्षक रहाट पाळणे आणि अन्य सुविधा उपलब्ध करुन देणारे ओरिसाचे अच्युत आनंद कुणी साहू, लातूरचे महेबूबभाई तांबोळी, मधू ठाकूर, नालासोपारा, मुंबईचे सुभाषभाई चौधरी यांनी यावर्षीच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवाच्या माध्यमातून लातूरकरांना उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती यात्रा महोत्सव परिसरात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावर्षीच्या यात्रा महोत्सवात आकर्षक झुला, आकाश पाळणा, व्हील जॉईंट, ब्रेक डान्स, टोरा टोरा, सलंबो, नावडी कोलंबस, ड्रॅगन ट्रेन, क्रॉस व्हील, रेंजर झुला, टावर, भूत बंगला, फिलिपिनहून आलेल्या जलपरी शो सगळ्यासाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. त्याचबरोबर नवीन टम चायना विंड व्हील, स्विंग स्विमिंग चेअर, सुनामी झुला, स्विमिंग टॉवर तसेच आकर्षक ऑक्टोपस शो लातूरकरांचे लक्ष वेधून घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे लहान मुलांसाठीही आकर्षक चिल्ड्रन पार्क उभारण्यात आले आहे.

यात्रेचा आनंद घेण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास, गैरसोय होणार नाही याची विशेष काळजी यात्रा महोत्सव समितीकडून घेतली जात आहे. रस्त्यावर धूळ उडू नये याकरिता मॅट अंथरण्यात आली आहे. तसेच धूळ उडू नये म्हणून दररोज पाणीही मारण्यात येत आहे. धूळ मुक्त यात्रा महोत्सव करण्याचा प्रयत्न असून यात्रा परिसरात कायदा सुव्यवस्था बिघडू नये व नागरिकांना संपूर्ण अमेझॉन पार्क चा आनंद घेता यावा यासाठी यात्रा संयोजक कमिटीच्या वतीने टॉवरची निर्मिती करण्यात आली आहे. संपूर्ण यात्रा परिसर सीसीटीव्हीच्या नियंत्रणाखाली खाली आहे.देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर, सुरेश गोजमगुंडे, ओमप्रकाश गोपे,व्यंकटेश हालिंगे,सिध्देश्वर उकरडे, महादेव खंडागळे, महादेव बन, अच्युतानंद कुणी साहू, ओरिसा, महेबूबभाई तांबोळी, सुभाषभाई चौधरी, नालासोपारा मुंबई. मधु ठाकूर लातूर व महाशिवरात्री यात्रा संयोजन समिती, लातूर. लातूरकरांनी या आकर्षक सुविधाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## अग्रलेख...

# जागतिक नेतृत्वाची नवी संधी!

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आश्चर्यकारक क्रांती म्हणून नव्या शतकात उदयास आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता नावाच्या दुधारी हत्याराचे संपूर्ण उपयोग ध्यानात येण्याआधीच त्याच्या विनाशकारी बाजूच अंगावर उजेडात येऊ लागली. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विवेकाने झाला नाही, तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या रूपाने माणसाच्या मानगुटीवर बसलेला हा भस्मासुर आपल्या प्रगतीच्या सर्व वाटांनाच गिळंकृत करून भयाचे वातावरण निर्माण करेल, ही शंका खरी ठरू लागल्यानंतर आता त्याला लगाम घालण्याच्या जागतिक प्रयत्नांमध्ये भारताने घेतलेला पुढाकार लक्षणीय ठरतो. सोमवारपासून राजधानी दिल्लीत सुरू झालेल्या 'इंडिया एआय इम्पॅक्ट समीट २०२६' या पाच दिवसांच्या परिषदेत, याच तंत्रज्ञानाचे धोके आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराचे विविध पैलू यांचा व्यापक अभ्यास होणार आहे. एकूण ७०० सत्रांमध्ये या परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पैलूंचा अभ्यास, उपयोग, उपद्रव आणि उपाय या सर्व बाबींवर सखोल विचारमंथन होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करताना घ्यावयाची सुरक्षिततेची काळजी, शासन-प्रशासनातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा सदुपयोगी वापर, देशाच्या दृष्टीने संवेदनशील समजल्या जाणाऱ्या क्षेत्रात हे तंत्रज्ञान वापरण्याची भारतीय नीती आणि जागतिक परिस्थितीतील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबतचा दृष्टिकोन अशा विविध मुद्यांचा या परिषदेत ऊहापोह होणार आहे. या परिषदेत या तंत्रज्ञानाच्या विवेकी वापराविषयीची जागतिक स्तरावरील मार्गदर्शक तत्त्वे निश्चित झाली, समस्यांवरील उपायांचा ऊहापोह झाला, तर या तंत्रज्ञानाच्या वापराबाबत भारत जगाचे नेतृत्व करेल आणि जागतिक मंचावर भारताच्या मानवी बुद्धिमत्तेचा पुरावाही सिद्ध होईल.

सामाजिक सुरक्षिततेस आव्हान देणाऱ्या वा समाजहितास घातक अशा कोणत्याही गोष्टीस लगाम घालावयाचा असेल, तर जनजागृती हा सर्वाधिक महत्त्वाचा उपाय असतो. वाढती गुन्हेगारी, फसवणूक, आर्थिक घोटाळे, भ्रष्टाचार आदी अनेक बाबी सामाजिक स्वास्थ्य बिघडविणाऱ्या असतात. त्यांना आळा घालण्याच्या प्रशासनात यंत्रणा सतत सजग असतातच; पण समाजाने किंवा नागरिकांनी जागरूक राहून अशा बाबींविरोधात सावधानता बाळगली, तर यापासून उद्भवणारे धोके टाळणे शक्य होते. डिजिटल व्यवहारांचे असंख्य फायदे देशात दिसू लागल्यानंतर डिजिटल फसवणुकीचे गैरप्रकार देशात वाढू लागले. अनेकांना अशा फसवणुकीचे फटके बसू लागल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्याची गंभीर दखल घेतली. गेल्या काही वर्षांत अशा गुन्हेगारीच्या माध्यमातून कष्टाने मिळविलेल्या कोट्यवधींच्या रकमेवर गुन्हेगारांनी डल्ला मारलाच; पण निष्पाप, निरपराध सामान्य नागरिकांस प्रचंड मनस्तापही भोगावा लागला आहे. एखाद्या गंभीर गुन्ह्यात हात असल्याचा आरोप करणाऱ्या दूरध्वनीमुळे कुटुंबाचे मानसिक स्वास्थ्य बिघडल्याच्या व मानसिक ताण असह्य झाल्यामुळे मृत्यू ओढवल्याच्या काही घटना याआधी घडल्या असल्याने 'डिजिटल अरेस्ट' नावाने फोफावलेली सायबर गुन्हेगारी असो किंवा डिजिटल संकेतांकांची चोरी करून पैशाची लुबाडणूक असो, असे प्रकार रोखण्याकरिता जनतेनेच जागरूक राहावयास हवे. 'थांबा, विचार करा आणि कृती करा' असा एक कानमंत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका संवादात्मक कार्यक्रमातून जनतेस दिला होता. पण या कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापराची पातळी एवढी खाली गेली आहे की, एवढ्या उपाययोजना माणसाच्या डिजिटल सुरक्षिततेची कडेकोट हमी देण्यास अपुऱ्या ठरू लागल्या आहेत. या तंत्रज्ञानाद्वारे होणारी फसवणूक म्हणजे सामाजिक आणि आर्थिक सुरक्षिततेवरील घाला आहे, त्यामुळे या परिषदेच्या निमित्ताने अशा धोक्यांना आळा घालण्यासाठी भारतास आपली संपूर्ण प्रतिमा कशा प्रकारे पणाला लावावी लागणार आहे, सार्वजनिक डिजिटल सुविधांचा विस्तार करताना सुरक्षिततेची कोणती खबरदारी घ्यावी लागणार आहे आणि या तंत्रज्ञानाचा सर्वाधिक वापर होत असलेल्या स्वदेशी क्षेत्रांचा पाया जागतिक स्तरापर्यंत विस्तारण्यास कोणती मदत होणार आहे आदी बाबी स्पष्ट होतील. जगाच्या दृष्टीने या बाबी सार्वत्रिकदृष्ट्या मार्गदर्शक ठरणार असल्याने, या क्षेत्राच्या सुरक्षित आणि विवेकशील वापराच्या नैतिकतेची संहिता आखून देणारा भारत हा जगातील पहिला देश ठरणार आहे.

डिजिटल गुन्हेगारीचा वाढता सुळसुळाट पाहता, आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर हे भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान असेल. जसजसे कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान विकसित होत जाते, तसतसा त्याचा गैरफायदा घेण्याचे तंत्रज्ञान विकसित होत असते. त्यातूनच सायबर गुन्हेगारी वाढीस लागली असून कोट्यवधी रुपयांची लूट सुरू झाली आहे. या गुन्हेगारीस आळा घालण्याचे उपाय शोधणाऱ्या असंख्य परिषदा गेल्या काही वर्षांत झाल्या. या क्षेत्रातील तज्ज्ञांनी उपाय शोधण्यासाठी अहोरात्र संशोधने सुरू ठेवली आहेत. दहशतवादाहूनही अधिक भय फैलावणाऱ्या व दुरान्वयाने देखील सावट माजविणाऱ्या या गुन्ह्याचे आव्हान अधिकाधिक गडद होऊ लागले असून सायबर गुन्हेगारी पूर्णपणे रोखणे सोपे नाही, याची जाणीव आता या यंत्रणांनाही झाली आहे. समाजमाध्यमांचा प्रचंड फैलाव झाल्यामुळे आभासी मंचाची उपलब्धता आता सर्वांसाठी सोपी झाली आहे. प्रचंड प्रमाणात वाढलेल्या फसवणुकीच्या असंख्य प्रकरणांचा तपास गेल्या १० वर्षांतही अधिक काळापासून संपूर्ण यशाच्या टप्प्यापर्यंत पोहोचू शकलेला नाही. या गुन्हेगारांचा नेमका ठावठिकाणा शोधणे हे एक आव्हान आहे. अनेकदा ही गुन्हेगारी देशाबाहेर असल्याने कायदेशीर कारवाईवरही मर्यादा येत असल्याचे सांगण्यात येते. या गुन्हेगारीची पाळेमुळे शोधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे विकसित तंत्रज्ञानाचे वरदान ठरेलच, पण त्याचा गैरवापर झाल्यास तो सर्वात धोकादायक शापही ठरेल, ही सुरुवातीची भीती वास्तविक असल्याच्या जाणिवा आता होऊ लागल्या आहेत. डीपफेक, कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर करून होणारे सायबर हल्ले नजीकच्या भविष्यकाळात तीव्र होणार आहेत, असा इशारा देशात 'डाटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडिया (डीएससीआय)'चा एक अहवाल अलिकडेच प्रसिद्ध झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून घडणारे असे गुन्हे शोधणे अधिक अवघड होणार आहेच; या गुन्ह्यांचे जाळे पसरविणे मात्र सोपे होणार आहे, असा या अहवालाचा इशारा आहे. गेमिंग ॲप्स, अधिक परताव्याची प्रलोभने दाखवून ऑनलाईन गुंतवणुकीची आमिषे, ओटीपीच्या माध्यमातून होणारी लुबाडणूक अशा अनेक प्रकारांचा सुळसुळाट झाला आहे. केवळ डिजिटल अरेस्टसारख्या भयावह गुन्हेगारीतून आणि शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या माध्यमातून पैसे कमावण्याच्या प्रलोभनांस बळी पडून नागरिकांनी हजारो कोटींची कमाई सायबर गुन्हेगारांनी लुबाडली आहे. केवळ आर्थिक लुबाडणूक हेच या तंत्रज्ञानाच्या गैरवापराचा भस्मासुर रोखण्यापुरतीच आव्हान नाही, तर या माध्यमातून संवेदनशील माहितीची चोरी, सामाजिक शांततेस धोका निर्माण करणाऱ्या हालचाली रोखण्याचे आव्हानही पायाडे बिकट होत जाणार आहे. सरकारी सेवांच्या नावाने बनावट ॲप्लिकेशन तयार करून लोकांस लुबाडण्याचे व फसविण्याचे प्रकार वाढीस लागण्याची भीती असल्याने, एकंदरीतच संपूर्ण व्यवस्थांवरील विश्वासार्हता पणाला लागणार आहे. सरकारी सेवांच्या नावाने समाजमाध्यमांवर बनावट व्यवस्था निर्माण करून त्यामध्ये गुंतवणूक करण्याची आमिषे दाखवून फसविण्याचे प्रकार वाढले, तर ते मोठेच संकट ठरेल. त्यामुळे ज्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा वापर करून गुन्हेगारीने उच्छाद मांडला, तेच तंत्र वापरून गुन्हेगारी मोडून काढण्याचे मार्ग या परिषदेत शोधले जातील आणि डिजिटल सुरक्षितता, सामाजिक आणि संवेदनशीलता जपली जाऊन या तंत्रज्ञानाविषयी विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यास ही परिषद उपयुक्त ठरली, तर ते भारताचे मोठे यश ठरेल. सायबर गुन्हेगारांना वेसण घालून नागरिकांचे हक्क सुरक्षित राखण्यासाठी सरकारी स्तरावर प्रयत्न सुरू असले, तरी नागरिकांनी जागरूकता दाखविली तरच या युद्धास बळ मिळणार आहे. सायबर गुन्ह्यांचे सतत डोक्यावर टांगलेले मळभ दूर होण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरेल, तर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील भारताचे नेतृत्व जगाला मान्य करावे लागेल. यासाठी केंद्र सरकारच्या पुढाकाराने सुरू झालेली ही परिषद महत्त्वाची भूमिका बजावेल. जगभरातील ४५ हून अधिक देशांतील नेते, धोरणकर्ते, उद्योजक आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील तज्ज्ञ यांच्या नजरेने या परिषदेकडे पाहात आहेत.

## स्मरण

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे देखणे कुमार मामा

**डॉ. रिता विवेक सोनटके**

तुमचं असणं सर्व काही होतं. आयुष्यातील एक ते सुवर्ण पर्व होतं. आज सर्व काही असल्याची जाणीव आहे पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी शशिकुमार शंकरराव भगत यांचे निधन झाले. मृत्यू हे एक शाश्वत सत्य असले तरी त्यांच्या मृत्यूमुळे आमच्या आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली आहे. शशिकुमार भगत यांचा जन्म १८ डिसेंबर १९४४ साली मुक्तापूर येथे झाला.त्यांना तीन मोठ्या बहिणी व तीन मोठे भाऊ होते. ते घरात सर्वांत लहान असल्यामुळे सगळ्यांचे लाडके होते. दै. तरुण भारतमध्ये त्यांनी १९६८ ते २००४ पर्यंत जवळपास ३६ वर्षे काम केले व कार्यकारी संपादक म्हणून ते निवृत्त झालेत. चित्रपटसृष्टीवरील त्यांचे लिखाण अतिशय प्रसिद्ध होते.त्यांचे व्यक्तिमत्व अतिशय देखणे, मृदुभाषी व साधे होते.

भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. अप्रतिम, अत्यंत साधी व सोपी भाषा त्याला साहित्यिक वळण असे त्यांचे लिखाण होते. ते फक्त आमचेच मामा नव्हते तर बहुतांश लोक त्यांना कुमार मामा म्हणत असे.स्वच्छतेची अत्यंत आवड असणारे, देखणे कर्तबगार व सरस्वतीचा वरदहस्त असणारे आमचे मामा आज आपल्यात नाहीत, हे सत्य पचवणे जरा जडच जात आहे.त्यांनी ८० व्या दशकातील अनेक चित्रपट कलाकारांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यामुळे त्यांच्यासोबत प्रत्यक्ष भेटीचा सुवर्णयोग त्यांना मिळत असे. ते १९९१ साली पत्रकार संघाचे अध्यक्ष होते. बरेच वर्ष त्यांनी तरुण भारतच्या दिवाळी अंकाची मुख्य संपादक म्हणून जबाबदारी सांभाळली.त्यातील एका अंकाला प्रथम क्रमांक मिळाला होता.अनेक



पुस्तकांसाठी प्रस्तावना लिहिल्या. त्यात डॉ. शेंबेकर यांच्या तसेच इकेबाना या लताताई व्यवहारे यांच्या पुस्तकांचा समावेश आहे. दि. ३ जून २००३ रोजी जर्मनी, रशिया व स्वित्झर्लंड या तीन देशांचा दौरा आटोपून तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे विशेष विमान मायदेशी परत निघाले होते. या विमानात अटलजी यांच्या प्रतिनिधी मंडळासोबत जे सुमारे दोन डझन पत्रकार होते त्यात तरुण भारतचे शशिकुमार भगत हेसुद्धा होते. ते जवळपास आठ दिवस अटलजींसोबत होते. मला वाटतं की, ते त्यांच्या आयुष्यातील एक अपूर्व , चिरंतन टिकणारे व अविस्मरणीय क्षण असावेत. त्यांना अटलजींची मुलाखत घेण्याची संधी मिळाली व तसेच त्यांच्यासोबत घालविलेले देवदुर्लभ क्षण म्हणजे सुवर्ण पर्वणीच असावी.फक्त अटलजीच नव्हे तर दिवंगत प्रमोद महाजन हे जेव्हा भंडारा जिल्ह्यात दौऱ्यावर होते तेव्हा त्यांची सुद्धा मुलाखत मामांनी घेतली होती. १९८० मध्ये बंगलोर फिल्म फेस्टिव्हलमध्ये त्यांनी सत्यजित रे, यश चोप्रा व गुलजार यांची मुलाखत घेतली. संपादक असल्यामुळे विविध विषयांवर अप्रतिम असे लिखाण व सिनेसृष्टीतील दिग्गज लोकांच्या त्यांनी भेटी व मुलाखती घेतल्या. त्यात गुलाम अली, सचिन पिळगावकर, स्मिता पाटील, ओम शिवपुरी, नितीन मुकेश, राजीव कपूर, वैजयंती माला, सुरेश ओबेरॉय, हेमा मालिनी इत्यादी कलावंतांचा समावेश आहे.त्यांच्यासोबत त्यांचे सुंदर फोटो पण आहेत.

मामांच्या मित्रपरिवारामध्ये नागपुरातील अनेक नामवंत डॉक्टरांचा समावेश होता. त्यात मेडिकलचे अधिष्ठाता स्व. डॉ.चौबे, स्व. डॉ. व्यवहारे, डॉ. बाभुळकर, डॉ. शेंबेकर, डॉ. कोलवाडकर आदींचा समावेश आहे. कुमार मामा आज आपल्यात नाही, पण त्यांचे लिखाण, त्यांच्या आठवणी आपल्यासोबत सदैव राहतील यात तिळमात्र शंका नाही.त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी मीना मामी व मुलगी केतकी, जावई जयदीप, नातू व नात आहेत. ईश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो हीच प्रार्थना. ओम शांती शांती!

"Though you are not with us but your memories in the form of beautiful write up will be forever."

९४२२८२७५४७

## वेध

**विजय निचकवडे**

# 'पांढऱ्या' कोटातील 'काळा' कारभार!

आज आम्हाला 'स्व'चा विसर पडला आहे. म्हणजे स्वतःचे कर्तव्य, जबाबदाऱ्या विसरत चाललो आहोत. म्हणूनच जे आपल्याशी सुसंगत नाही, त्याची 'संगत' वाढली अन् नीतिमूल्यांचा ऱ्हास झाल्यागत आपण वागू लागलो आहोत. दिवसागणिक नवनवीन पण मन सुन्न करणारे प्रकार पुढे येत आहेत. डॉक्टर आमच्यासाठी देवचं ना, पण तोच जिवाचा बाजार मांडत असेल आणि या बाजारात खरेदीदारांची गर्दी वाढून जिवांची बोली लागत असेल तर 'पांढऱ्या' कोटातील 'काळा' कारभार नैतिक अधःपतन नव्हे का? नीती, मूल्ये, समाजभान आणि सामाजिक दायित्व या गोष्टी गाठोड्यात बांधल्या गेल्या आहेत. मी, माझं आणि माझ्यासाठी एवढ्याच विश्वात स्वतःचं समाधान शोधणारी मानसिकता बोकाळत चालली आहे. हे सर्व करताना पैसा हा प्रत्येकाची कमजोर होऊन बसला आहे. पैसा मिळविण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाण्याची तयार अनेकांची असते अन् त्याचा प्रत्ययही अनेकदा येतो. मात्र, हे करताना आपण आपल्या 'स्व' ला गहाण ठेवतो, याचे भान कुणाला नाही. माझी जबाबदारी काय? मी ज्या पेशात आहे, त्याचे कर्तव्य कोणते? त्याकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे? हे आर्थिक स्वार्थापुढे विसरलो आणि नीतिमूल्यांचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली.

खरं तर वैद्यकीय क्षेत्र म्हणजे पवित्र! डॉक्टर म्हणजे आम्हा प्रत्येकासाठी देवापेक्षा कमी नाही. कारण ते हात अनेकांचे जीव वाचवितात. मोठ्या विश्वासाने आम्ही आमच्या जिवापाड जपत असलेल्या लोकांना उपचारासाठी डॉक्टरांच्या सुपूर्द करतो. यामागे असतो, तो केवळ आणि केवळ डॉक्टरांवरील विश्वास! आज हा विश्वास किती ठेवावा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या क्षेत्रातील काही महाभागांचे प्रताप वैद्यकीय क्षेत्रालाही नासवीत आहे. चार-दोन लोकांच्या कृतीने खऱ्या अर्थाने प्रामाणिकपणे आपले कर्तव्य वहन करणाऱ्या डॉक्टरांनाही खाली पाहण्याची वेळ येते, तेव्हा नैतिक अधःपतन झाल्याची जाणीव होते.

भंडारा जिल्ह्यात सध्या चांगलेच चर्चेत असलेले बाळ विक्री प्रकरण डॉक्टरांवरील विश्वास क्षणात संपविणारे आहे. उपचाराच्या नावाखाली रुग्णालयात ठेवीत असल्याचे सांगून चक्क लाखो रुपयात एका नवजात चिमुकलीचा 'सौदा' करून स्वतःच्या घरात आर्थिक संपन्नता आणण्याचा प्रयत्न करणारा डॉक्टर खरंच डॉक्टर म्हणविण्याचा योग्यतेचा आहे का? ज्या हातांनी जीव वाचवायचे, तेच हात जीव विकू लागले तर हा मांडलेला जिवाचा बाजार विकृत मानसिकतेचे दर्शन घडविणाराच आहे. जागतिक स्तरावर मुलांची विक्री हा अतिशय गंभीर आणि अमानवीय गुन्हा मानला जातो. पण हे जर सुशिक्षित मानवी मनाला समजत नसेल, तर हे बाजार भविष्यात व्यापक स्वरूपाचे होतील, हे तेवढेच खरे! कुणाच्या तरी परिस्थितीचा फायदा घेत स्वतःचा स्वार्थ साधायचा. हे करताना आपले कर्तव्य, आपल्या व्यवसायातील नैतिकता विकून टाकल्यागत वागायचे, याचे समर्थन होऊच शकत नाही? वैद्यकीय व्यवसायातील नीतिमत्ता पायदळी तुडविण्याचा हा प्रकार विविधांगांनी विचार करण्यास भाग पाडणारा आहे. अशावेळी डॉक्टरांचे दवाखाने म्हणजे बाळ विक्रीचा सुरक्षित अड्डा म्हणायचा का? हा प्रश्न पडतो. एक डॉक्टर असे करत असेल, तर ही नक्कीच त्याच्या वैद्यकीय व्यवसायाशी केलेली प्रतारणा आहे. पण मग अशा मानसिकतेला खतपाणी घालणाऱ्या समाजाचाही विचार व्हायला हवा! मुलांची विक्री हा प्रकार अवैध दत्तक विधान म्हणूनही पाहिला जातो. जे नियमानुसार नाही, ज्यासाठी 'त्या' जिवांची बोली लागते, ते चुकीचेच आहे. याची जाणीव असातानाही मुलांची खरेदी करण्याची चूक करण्याचे धाडस का होते, हा प्रश्नच आहे. डॉक्टरांनी जरी असा बाजार मांडला, तरी त्या बाजारात जाऊन व्यवहार करायचे की नाही, याचे तारतम्य या सौदबाजीत सहभागी होणाऱ्यांनी ठेवायला पाहिजे. आज मुलं न होणे ही समस्या वाढताना दिसते. याची अनेक कारणेही असतील. पण मग पैसे देऊन विकत घेतलेल्या मुलांमध्ये आपण खरा आनंद शोधू शकतो का? वस्तूंच्या बाजारातून एखादी गोष्ट विकत आणल्यानंतर त्याबद्दल किती आत्मियता आणि जिव्हाळा आम्हाला असतो, हे सर्वश्रुत आहे. तेवढ्यापुरते असलेले कौतूक नंतर आटू लागते. अशावेळी पैसे मोजून आणलेल्या बाळाप्रतीचा जिव्हाळा, प्रेम आटू लागल्यास अशा लेकरांची आयुष्यभराची होणारी हेळसांड मानवतेच्या सर्व सीमा पार करणारीच असेल! डॉक्टर म्हणून त्यांनी मांडलेला लेकरांचा बाजार नक्कीच त्यांच्या नैतिक अधःपतनाचे लक्षण आहे, पण माणूस म्हणून आपल्याला परमेश्वराने दिलेल्या वैचारिक क्षमतेचा वापर करून अशा बाजारांमध्ये आपण खरेदीसाठी जायचे की नाही, याचा विचार आपल्यालाच करायचा आहे. नाहीतर आज एक बाळ विकले गेले, उद्या हा आकडा वाढेल आणि आपण केवळ हे किती चुकीचे आहे, यावरच चर्चा करत राहू.

९७६३७१३४१७

## विशेष

# समुद्रानजीक औद्योगिकीकरण फायदेशीर

**प्रा. सुखदेव बखळे**

भारताला साडेसात हजार किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला असून देशात सुमारे २१२ लहान आणि मोठी बंदरे आहेत. तथापि, पायाभूत सुविधांच्या कमतरता शेवटच्या मैलाची मर्यादित कनेक्टिव्हिटी आणि एकात्मिक नियोजनाच्या अभावामुळे अनेक दशकांपासून ही क्षमता वापरात आली नाही. किनारपट्टीच्या फायद्याचे धोरणात्मक आणि आर्थिक महत्त्व ओळखून भारत सरकारने 'सागरमाला' कार्यक्रम सुरू केला. सागरमाला कार्यक्रम किनारपट्टी विकासासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. हा केवळ पायाभूत सुविधांचा प्रचार नाही, तर अभियांत्रिकी, अर्थशास्त्र, शाश्वतता आणि प्रशासन यांना एकत्र आणणारा परिवर्तनात्मक अजेंडा आहे. कार्यक्रमाचे यश केवळ भांडवली गुंतवणुकीवरच नाही, तर अनुभवजन्य डेटा आणि पर्यावरणीय जागरूकतेद्वारे मार्गदर्शन करणाऱ्या निर्णयांच्या गुणवत्तेवरदेखील अवलंबून आहे. येत्या काही वर्षांमध्ये भारताची बंदर क्षमता चार हजार दशलक्ष टन प्रति तासाहून अधिक होण्याचा अंदाज आहे. ही वाढ ग्रीनफील्ड डेव्हलपमेंट, मोठ्या नसलेल्या बंदरांवर क्षमता वाढ आणि विद्यमान बंदरांवर तांत्रिक सुधारणा यांच्या मिश्रणातून होईल. सागरमाला कार्यक्रमाचे वेगळेपण म्हणजे त्याचा एकात्मिक दृष्टिकोन. तो बंदरांकडे केवळ स्वतंत्र मालमत्ता म्हणून पाहत नाही, तर औद्योगिक कॉरिडॉर, लॉजिस्टिक्स पार्क, अंतर्देशीय जलमार्ग आणि सामाजिक विकास उपक्रमांसह मोठ्या परिसंस्थेचे आवश्यक घटक म्हणून पाहतो.

एकंदरीत, कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे भारतातील शाश्वत, समावेशक आणि कार्यक्षम बंदर परिसंस्थेचा मार्ग मोकळा होईल. बंदरे आणि शिपिंगची पुनर्कल्पना परिघीय पायाभूत सुविधा म्हणून नव्हे, तर राज्याच्या आर्थिक विस्ताराच्या पुढील टप्प्यासाठी केंद्रस्थानी म्हणून केली जात आहे. महाराष्ट्राला ७२० किलोमीटरचा लांबीचा किनारा आणि जगातील काही सर्वांत व्यस्त बंदरे लाभली आहेत. बंदरे अस्तित्वात होती, परंतु बहुतेक उपयुक्तता म्हणून, धोरणात्मक वाढीचे इंजिन म्हणून नाही. त्याचा आता पुनर्विचार केला जात आहे. जागतिक व्यापारपद्धती बदलत असताना आणि लॉजिस्टिक्स खर्च स्पर्धात्मकतेला आकार देत असताना महाराष्ट्र विकासाच्या दृष्टिकोनाचे पुनर्संचयन करत आहे. बंदरे आणि जहाजबांधणी ही उपपायाभूत सुविधा म्हणून नव्हे, तर राज्याच्या आर्थिक विस्ताराच्या पुढील टप्प्यातील केंद्र म्हणून पुनर्कल्पित केली जात आहे. किनारपट्टी एक आर्थिक संसाधन आहे. सागरी मालमत्ता मूलभूत आहेत. उत्पादन आणि निर्यात केंद्र म्हणून उदयास येण्याच्या भारताच्या तीव्र इच्छेने लॉजिस्टिक्स कार्यक्षमता धोरणाच्या प्रकाशझोतात आणली आहे. आज बंदरे कार्गो हाताळण्या व्यतिरिक्तही बरेच काही करतात. कारखाने कुठे आणले जातात, पुरवठा साखळ्या कशा आयोजित केल्या जातात आणि कोणते प्रदेश गुंतवणूक आकर्षित करतात यावर त्यांचा प्रभाव पडतो.

महाराष्ट्राचे नूतनीकरण केलेले सागरी लक्ष्य 'सागरमाला'सारख्या राष्ट्रीय उपक्रमांशी सुसंगत आहे, परंतु त्यावर एक वेगळा राज्यस्तरीय भर आहे. बंदर नेतृत्वाखालील औद्योगिकीकरण हे त्याचे ध्येय आहे. बंदरांचा वापर करून किनाऱ्यावरील उत्पादनसमूह, लॉजिस्टिक्स इकोसिस्टिम आणि रोजगार निर्मितीसाठी एक आधार म्हणून काम करणे हेच त्याचे उद्दिष्ट आहे. या मांडणीत बंदरे ही अंतिम बिंदू नाहीत, तर राज्याच्या आर्थिक सुबत्तेचे प्रवेशद्वार आहेत.



प्रस्तावित वाढवण बंदर महाराष्ट्राच्या महत्त्वाकांक्षेचे प्रमाण दर्शवते. मुंबईच्या विद्यमान बंदरांवर गर्दी कमी करणे आणि पश्चिम किनाऱ्यावरील भारताच्या ट्रान्सशिपमेंट क्षमता मजबूत करणे, हे त्याचे उद्दिष्ट आहे. आधुनिक बंदरे वेळेचा कार्यक्षम वापर करू शकतात. मालवाहतुकीचा खर्च कमी करू शकतात आणि पुरवठा साखळीची विश्वासार्हता सुधारू शकतात. हे फायदे किनाऱ्यापासून दूर असलेल्या औद्योगिक पट्ट्यांमध्येदेखील होतात. महाराष्ट्राच्या बंदर धोरणातील एक परिसंस्था कार्गो हाताळणीच्या पलीकडे विस्तारलेली आहे. ती एक परिसंस्थाच असून त्यात लॉजिस्टिक्स पार्क, जहाजबांधणी आणि दुरुस्ती सुविधा, मत्स्यपालन पायाभूत सुविधा किनारी पर्यटन आदी घटकांचा समावेश होतो. हे सर्व घटक एकत्रितपणे 'नील अर्थव्यवस्थे'शी निगडित आहेत. समुद्र आणि किनाऱ्यांशी जोडलेल्या आर्थिक क्रियाकलापामध्ये व्यापार, उपजीविका आणि सेवांचा समावेश होतो. विशेषतः कोकणात बंदरांशी निगडित विकास दीर्घकाळापासून रखडलेली पायाभूत सुविधा गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीचे आश्वासन देतो.

हे धोरण प्रभावीपणे अंमलात आणले गेले, तर सागरी विकास राज्यातील प्रादेशिक विकासाचे संतुलन पुन्हा साधू शकतो. शहरी केंद्रांवरील दबाव कमी करून किनाऱ्यालगत नवीन विकास कॉरिडॉर उघडू शकतो. सागरी विस्तार क्वचितच व्यत्ययाशिवाय पुढे जातो. किनारी क्षेत्रे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील आहेत आणि बंदर प्रकल्प बहुतेकदा मासेमार समुदायांच्या उपजीविकेशी जोडलेले असतात. संपूर्ण भारतात अशा प्रकल्पांना भूसंपादन, पर्यावरणीय परिणाम आणि भरपाई चौकटींबाबत विरोधाचा सामना करावा लागला आहे. महाराष्ट्र सरकारने या घटकांची सुरक्षा आणि सल्लामसलत करण्यास वचनबद्ध असल्याचे स्पष्ट केले आहे, परंतु पूर्वानुभवानुसार या प्रक्रियांमध्ये सातत्य असायला हवे, असे वाटते. पर्यावरणीय मंजुरी आणि भागधारकांचा सहभाग हे केवळ नियामक अडथळे नाहीत, ते प्रकल्पाची व्यवहार्यता निश्चित करणारे घटक आहेत. खटले किंवा विरोधामुळे होणारा विलंब आर्थिक परतावा आणि सार्वजनिक विश्वास दोन्ही लक्षणीयरीत्या कमी करू शकतो. प्रशासनाच्या दृष्टिकोनातून येथेच महाराष्ट्राच्या सागरी धोरणाला सर्वांत कठीण परीक्षेचा सामना करावा लागतो. बंदर धोरण एका जटिल संस्थात्मक वळणावर आहे. राज्य विभाग, केंद्रीय संस्था, पर्यावरण नियामक आणि स्थानिक सरकारे प्रकल्प विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर अधिकार वापरतात. यासाठी प्रशासकीय शिस्तीची गरज आहे. राजकीय नेते निर्णय घेण्यास गती देऊ शकतात, परंतु दीर्घकालीन यश अंमलबजावणी क्षमतेवर अवलंबून असते.

शिपिंगकडे अनेकदा कमी लक्ष दिले जाते. किनारी शिपिंग आणि अंतर्देशीय जलमार्ग रस्ते वाहतुकीपेक्षा किफायतशीर आणि कमी उत्सर्जन पर्याय देतात, तरीही त्यांचा वापर मर्यादित राहतो. कार्यपद्धतीतील सुधारणांशिवाय वाढीव बंदरक्षमतेचे फायदे अपूर्ण राहतील. २०२६ ते २०३५ दरम्यान महाराष्ट्राची सागरी रणनीती राज्याच्या आर्थिक भूगोलात बदल घडवून आणू शकते. कार्यक्षम बंदरे आणि एकात्मिक शिपिंग नेटवर्कमध्ये शहरांची गर्दी कमी करण्याची, लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्याची आणि नवी किनारी विकास केंद्रे तयार करण्याची क्षमता आहे. तथापि, हा पूर्वनिर्धारित निष्कर्ष नाही. महाराष्ट्राची नील अर्थव्यवस्था धोरण शाश्वत विकास प्रदान करते, की वादग्रस्त पायाभूत सुविधांसाठी एक महत्त्वाचा मुद्दा बनते, हे संतुलन किती प्रभावीपणे राखले जाते यावर अवलंबून असेल. बंदरांचे आधुनिकीकरण, किनारी आर्थिक क्षेत्रे तयार करणे आणि बंदर नेतृत्वविकासाच्या मजबूत चौकटीद्वारे लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे, हा एक प्रमुख देशव्यापी उपक्रम आहे. हा कार्यक्रम अलिकडच्या वर्षांमध्ये हाती घेतलेल्या सर्वांत मोठ्या पायाभूत सुविधा परिवर्तनांपैकी एक आहे. सागरी क्षेत्र केवळ वस्तूंच्या वाहतुकीसाठी आवश्यक नाही, तर रोजगार निर्मिती, औद्योगिक विकास आणि राष्ट्रीय सुरक्षेतही महत्त्वाची भूमिका बजावते. 'सागरमाला'च्या माध्यमातून भारत भौतिक पायाभूत सुविधा वाढवत असून आर्थिक विकासासाठी उत्प्रेरक म्हणून बंदरांना स्थान देणाऱ्या सहायक धोरणात्मक सुधारणा विकसित करत आहे.

सागरमाला कार्यक्रम पाच धोरणात्मक स्तंभांवर बांधला गेला आहे. बंदर आधुनिकीकरण, बंदर कनेक्टिव्हिटी, बंदर-नेतृत्वाखालील औद्योगीकीकरण, किनारी समुदाय विकास आणि किनारी नौवहन आणि अंतर्गत जलवाहतूक. हा बहुआयामी दृष्टिकोन सुनिश्चित करतो, की पायाभूत सुविधांचा विस्तार आर्थिक नियोजन आणि सामाजिक विकासाशी संक्रमित केला जातो. वाहतूक नेटवर्कला औद्योगिक कॉरिडॉर आणि समुदाय उपक्रमांशी जोडून सागरमाला किनारी विकासाचे समग्र मॉडेल स्वीकारते. सध्या कार्यक्रमांतर्गत २७७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत आणि इतर अनेक अंमलबजावणीच्या प्रगत टप्प्यात आहेत. प्रमुख बंदरांवर नवीन बर्थ सुरू करणे, किनारी नौवहनात वाढ आणि अंतर्गत जलमार्ग मालवाहतुकीत वाढ यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त क्रूझ पर्यटन आणि मत्स्यपालन पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केलेले प्रकल्प समावेशक वाढीच्या दृष्टिकोनात योगदान देत आहेत. भारताची बंदरे दर वर्षी अंदाजे १.३ अब्ज टन मालवाहतूक करतात आणि देशाच्या व्यापारापैकी सुमारे ९० टक्के व्यापार समुद्रमार्गे होतो. तथापि, मालवाहतूक अपुरी राहिली आहे, अनेक बंदरे गर्दीने भरलेली आहेत आणि काहींचा वापर कमी झाला आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## भारतीय संघ विजेतेपदाचा दावेदार

टी-२० विश्वचषक स्पर्धेत रविवारच्या सामन्यात भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडवत सुपर ८ मध्ये दिमाखात प्रवेश केला. भारताने पाकिस्तानला चारी मुंड्या चीत केले. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही क्षेत्रात पाकिस्तानवर वर्चस्व गाजवत सामना जिंकला. हा विजय मिळवून भारताने पाकिस्तानवरील वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले. विश्वचषकात पाकिस्तान भारताला फक्त एकदाच हरवू शकला. भारताने मात्र पाकिस्तानला तब्बल आठ वेळा हरवले आहे. या सामन्यात भारताचा सलामीवीर ईशान किशनने वादळी सुरुवात करून भारताला पावणेदोनशेचा टप्पा गाठून दिला. त्याने आक्रमक अर्धशतक झळकावले त्याला सूर्यकुमार यादव, शिवम दुबे, तिलक वर्मा, रिंकू सिंग यांनी चांगली साथ दिली. भारतीय गोलंदाजांनी तर कमाल केली. भारतीय गोलंदाजांसमोर पाकिस्तानच्या फलंदाजानी अक्षरशः नांगी टाकली. त्यांचा कोणताच फलंदाज भारतीय गोलंदाजीपुढे टिकू शकला नाही. जसप्रीत बुमरा, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव या भारताच्या सर्व प्रमुख गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी करून पाकिस्तानी फलंदाजांना जेरीस आणले. पाकिस्तानचे फलंदाज कसेबसे शतक पार करून शकले. पाकिस्तानला नमवण्यापूर्वी भारताने अमेरिका व नामिबियालाही असेच एकतर्फी नमविले होते. आता भारत सुपर ८ मध्ये पोहोचला आहे. विश्वचषकाची खरी लढाई आता सुरू झाली आहे, असे म्हणावे लागेल. जगातील सर्वोत्तम आठ संघ सुपर आठमध्ये असतील. तिथे लढाई सोपी नसेल; सर्वच संघ जिंकण्यासाठी खेळतील. टी-२० क्रिकेटमध्ये कोण जिंकेल हे कोणीच छातीठोकपणे सांगू शकत नाही. एखादे चांगले षटक किंवा एखादी छोटी पण महत्त्वपूर्ण खेळी सामन्याचे चित्र पालटवते; पण सध्याचा फॉर्म पाहता भारत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार वाटतो. भारतीय खेळाडूंनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर तीन वेळा टी-२० चा विश्वचषक जिंकणारा तसेच सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकणारा भारत पहिला संघ ठरू शकतो.

**श्याम ठाणेकर**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### सत्तातुराणां न भयं, न लज्जा

'टिपूला शिवरायांच्या समकक्ष मानायला हवे : हर्षवर्धन सपकाळ' ही बातमी वाचली (तरुण भारत, १५ फेब्रुवारी) आणि आजिबात आश्चर्य वाटले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजतागायत काँग्रेसच्या नेत्यांनी अनेक नायकांना/राष्ट्रप्रेमी संघटनांना खलनायक ठरवून त्यांची यथेच्छ बदनामी केली आहे; अजूनही ते ती करत आहेत. त्याचबरोबरीने जवळपास सर्वच खलनायकांना नायक ठरवून त्यांचे उदात्तीकरणही केले आहे. काँग्रेसचे नेते मोठे अभ्यासू इतिहास संशोधक असते तर त्यांच्या वक्तव्याला कदाचित गांभीर्याने घेतले गेले असते आणि त्यावर चर्चाही झाल्या असत्या. तसे काहीही नसताना केवळ अल्पसंख्यक समाजाचे लांगूलचालन करून, त्यांची मतं सत्ता मिळविण्यासाठी केली जात आहेत, हे अधिक संतापजनक आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची महती संपूर्ण जगाने मानली असताना त्यांची तुलना एका जुलमी सुलतानाशी करावी आणि तेही एका राष्ट्रीय पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलेल्या एका मराठी इसमाने, यासारखे दुर्दैव ते काय? सत्ताप्राप्तीसाठी काँग्रेस पक्ष कोणत्याही खालच्या पातळीवर जाऊ शकतो हे इतिहासात अनेकदा सिद्ध झाले आहे. समाजामध्ये धर्म, जातपात, पंथ, भाषा आणि प्रांत अशा अनेक मुद्यांवर फूट पाडून सत्ता मिळवण्याची काँग्रेस पक्षाची 'मोडस ऑपरेंडी' आहे. सत्तेपुढे देशहित, राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडता, सामाजिक आणि धार्मिक एकता, देशाची सुरक्षितता अशांसारख्या महत्त्वाच्या मुद्यांना काँग्रेसच्या लेखी काहीही किंमत नाही. म्हणूनच हर्षवर्धन सपकाळांच्या या आततायी आणि बेलगाम वक्तव्याचा कडाडून निषेध केला पाहिजे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### जाणता राजा

ज्या काळात माणसामाणसात भेद केला जायचा, त्या वेळी सर्व जाती-धर्मातील प्रजा ही आपली लेकरं आहेत. अशी आपुलकीची वागणूक देणारे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरीवर झाला. बालपणी केलेले योग्य संस्कारच माणसाला घडवत असते. शिवाजी महाराज घडविण्याचा सर्वांत मोठं हात जिजामातेचं आहे.

राजा हा प्रजेचा पालनकर्ता असतो, उपभोगी नसतो. प्रजेने उभे केलेल्या साम्राज्याचा तो केवळ विश्वास म्हणून धनी असतो, हे तत्त्व त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणले. स्वतःचे राज्य ही कल्पना त्यांना कधीच पटली नाही. राज्य हे प्रजेचे गोरगरिबांचे, साधुसंन्यासाचे आहे, या समजुतीनेच त्यांनी कारभार चालवला. महाराज कधीच जातिभेद करीत नव्हते, सर्वांना नियम सारखे होते. परस्त्रियांना आपली माता, बहीण मानत असत. १६७४ साली रायगड येथे त्यांचा भव्य राज्याभिषेक झाला आणि ते छत्रपती म्हणून गौरवले गेले. त्यांनी स्वराज्याचे स्वप्न सत्यात उतरवले आणि मराठी माणसाच्या मनात स्वाभिमान जागवला. जाणता राजा म्हणून ते लोकांच्या हृदयात अमर आहेत.

**प्रीती खोब्रागडे**/मालवण

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# प्रशासन काळात विविध विभागाचे २० कोटी थकले

## औशाचे उपनगराध्यक्ष अफसर शेख यांचा पत्रकार परिषदेत आरोप

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. १९ फेब्रुवारी :** प्रशासन काळातील थकित वीज बील, पाणीपुरवठाची दुरुस्ती, कंत्राटी कामागारांचे पगार, घनकचरा, कंत्राटदारांना देण्यात येर्णाय़ा दहा टक्के स्वनिधीच्या रकमेसह विविध योजनांचे जवळपास २० कोटी रुपयांची देयके औसा नगरपालिकेला द्यावयाची असल्याचा आरोप उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. अफसर शेख यांनी औसा येथे पत्रकार परिषदेत केला आहे.



औसा येथे पत्रकार परिषद झाली. त्यावेळी डा. अफसर शेख बोलत होते. जावेद शेख, गोविंद जाधव, अविनाश टिके, कृष्णा सावळकर, किर्ती कांबळे, शांताबाई बनसोडे, आनंद बनसोडे खुनमीर मुल्ला, मोलाना कलिमुल्ला सय्यद उपस्थित होते.

डा. अफसर शेख म्हणाले, प्रशासकांच्या कार्यकाळातील विविध योजनांचे शासकीय देणे असलेले जवळपास वीस कोटी रुपये प्रशासनाने दिले नाहीत. ही सर्व देयके देण्यासाठी नवीन पदाधिकाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. शहरातील रस्ते, नाल्यासह सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या हितासाठी ठोस निर्णय घेण्याचा निर्धार नगर परिषदेच्या १७फेब्रुवारी रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला असल्याची माहिती यावेळी डॉ. अफसर शेख यांनी दिली.

तसेच सर्वसाधारण सभेत औसा शहरातील बोकाळलेला मटका, अवैध दारू विक्री, बेकायदेशीर लॉजिग व इतर नियमबाह्य व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याचा ठराव सर्वसाधारण सभेत एकमताने घेण्यात येणार असल्याची माहिती उपनगराध्यक्ष डॉ. अफसर शेख यांनी दिली. शहरातील कायदा व सुव्यवस्था आणि सामाजिक वातावरण बिघडविणाऱ्या सर्व अवैध धंद्यांवर बंदी आणलीच पाहिजे, अशी भूमिका नगर परिषदेतील सदस्यांनी घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सभेतील विविध विषयांवर चर्चा करून निर्णय घेतले जाणार आहेत. सभेच्या अजेंड्यानुसार, प्रारंभी मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येणार आहे. त्यानंतर शहरातील सामाजिक प्रश्नांबाबत शासन धोरणानुसार कार्यवाही करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश देणे, तसेच संपूर्ण दारूबंदी, अवैध दारू विक्री, अवैध लॉज व क्लब हाऊस, मटका व्यवसाय, गुटखा विक्री, मुलींची छेडछाड, राशन दुकानांवरील बोगस कारभार आणि प्लास्टिक बंदी यांसारख्या गंभीर विषयांवर ठोस निर्णय घेण्यात येणार असल्याचे उपनगराध्यक्ष शेख यांनी सांगितले.

नगर परिषद क्षेत्रात 'नमो उद्यान' विकसित करण्याच्या प्रस्तावावरही सभेत चर्चा होणार असून नागरिकांसाठी सुशोभित व सुसज्ज हरित क्षेत्र उभारण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे. यासोबतच तीर्थक्षेत्र गोपाळपूर, बौद्ध विहार आणि ईदगाह परिसर विकास आराखड्यावर अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

नगर विकास विभागाच्या दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या शुद्धीपत्रकानुसार कळविण्यात आलेल्या शासन निर्णयांतील कार्यान्वयन यंत्रणा व कामे पूर्ववत ठेवावीत का, यावरही विचारविनिमय होणार आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता आणि विद्युत विभागाच्या वार्षिक निविदा मागविणे, विविधा विकासकामांचे ठेके निश्र्चीत करणे आदी प्रशासकीय विषय सभेत मांडलो जाणार आहेत. केंद्र शासन पुरस्कृत अमृत २ योजनेअंतर्गत मे. प्रगती कन्स्ट्रक्शन, लातूर यांनी सादर केलेल्या मुदतवाढ अर्जावरही चर्चा करून निर्णया घेतला जाणार आहे. आठवडी बाजारातील दुकाने व गाळ्यांच्या अधिमूल्य निश्र्चीती प्रस्तावासह ई-लिलाव प्रक्रियेवरही सभेत निर्णय घेण्यात येणार असल्याचे यावेळी डॉ. अफसर शेख यांनी सांगितले.

**आमदार साहेबांनी शहराच्या विकासासाठी मन मोठं कराव**

औसा शहरातील अंतर्गत सुरक्षतेसाठी सीसीटीव्ही बसविण्यासाठी सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी इतर कामासाठी वळवू नये. यासाठी आमदार आभिमन्यू पवार यांनी राजकारण बाजूला ठेवून मन मोठ करुन सहकार्य करावे. अशी अपेक्षा उपनगराध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष डाँ. आफासर शेख यांनी व्यक्त केली.

## संक्षिप्त...

### माजी चेअरमन विरभद्र अंकुलगे यांचे निधन



**वलांडी :** देवणी तालुक्यातील जवळगा गावचे रहिवासी तथा माजी चेअरमन विरभद्र गुंडाप्पा अंकुलगे दि.१७ फेब्रुवारी सायंकाळी हृदयविकाराच्या धक्क्याने दु:खद निधन झाले. तर त्यांच्यावर बुधवारी सकाळी ११ वा.स्वतच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्र्चात पत्नी, दोन मुलगे, मुली, बहिण, पुतणे, असा परिवार आहे. पत्रकार आनंद अंकुलगे, सचिन अंकुलगे यांचे काका तर सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय अंकुलगे वडील होत.

..........................................



दिनांक १९ फेब्रुवारी रोजी, स्वराज्य संस्थापक, राजाधिराज, राजे श्री श्री श्री शिवाजी राजे शहाजीराजे भोसले यांचा जन्मोत्सव, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सत्तरधरवाडी येथे साजरा करण्यात आला. श्री प्रशांत शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना शिवचरित्र याबद्दल माहिती सांगितली, राजे छत्रपती यांच्या काळातील काही प्रसंग जिवंतपणे उभे केले. तसेच श्री लोहारे सर व श्री खामकर सर यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले, विद्यार्थ्यांची भाषणे झाली, कार्यक्रमाची सांगता श्री आनंद पुंड यांच्या गीताने व पोवाड्याने झाली.

..........................................

### अनोळखी मयताचे प्रेत सापडले

**रेणापूर :** निवाडा कारखानाच्या उत्तर बाजूस कडील मैदानात एक अनोळखी इसमाचे प्रेत वय५० सापडले आहे मयताच्या अंगात पांढ्या कलरचा शर्ट भर त्यावर लाल पटट्या असून त्यावर स्वेटर. पायात काळ्या कलरची नाईट पॅट आहे. उंची साडे पाच फूट असून रंग सावळा असून चेहरा लांब ट गोल आहे.

वरील वर्णनाच्या मयत विषयी माहिती असल्यास पोलीस स्टेशन मध्ये कळवावे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांच्या मार्गदर्शाना खाली पोना व्ही एस. गिरी पुढील तपास करीत आहेत.

### वीरशैव तेली समाजाच्यावतीने श्री सिद्धेश्वरास गंगाजल अभिषेक



**लातूर :** लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रेस उत्साहात प्रारंभ झाला. १६ दिवस चालणारी ही यात्रा संपूर्ण मराठवाड्यासह सीमावर्ती भागात प्रसिद्ध आहे. गेल्या अनेक वर्षापासून वीरशैव तेली समाजाच्यावतीने श्री सिद्धेश्वरास गंगाजल अभिषेक व मानाची काठी परंपरा जपली असून याहीवर्षी प्रतिवर्षाप्रमाणे समाजाचे अध्यक्ष किशोर भुजबळ यांच्या हस्ते मानाच्या काठीचे पूजन करून प्रथेनुसार गंगेच्या पाण्याच्या कळशा समाजातील महिला भगिनी यांनी डोक्यावर घेऊन वाजत गाजत मंदिरात येऊन श्री सिद्धेश्वरास गंगाजल अभिषेक श्री हनुमंत (मुन्ना )भुजबळ, श्री.गुंडेराव चिंदे, श्री.विलास ब्याकुडे, श्री.अनिल क्षीरसागर, श्री.श्रीकांत म्हेत्रे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच माहेश्वरी समाज महिला भजनी मंडळाच्या वतीने वाजंत्री सहित मिरवणूक काढून मानाची काठी मंदिरात लावून अमावस्येचा दिवस साजरा करण्यात आला. मंदिर कमिटीचे विश्वस्त श्री बाबासाहेब कोरे यांनी मानाच्या काठीची पूजन करून स्वागत करण्यात आले. याप्रसंगी वीरशैव तेली समाजाचे अध्यक्ष श्री किशोर भुजबळ, जेष्ठ संचालक श्री भिमाशंकर देशमाने, श्री.नागनाथ भुजबळ, समाजातील ज्येष्ठ नागरिक, माता-भगिनी, समाज बांधव व वीरशैव तेली समाज सर्व संचालक मंडळ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माऊली शैक्षणिक संकुलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**लातूर :** येथील आंबेजोगाई रोडवरील माऊली शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचलित माऊली बालक मंदिर माऊली विद्यार्थी विकास केंद्र व माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल, लातूरचे स्नेहसंमेलन विश्व पॅलेस या ठिकाणी उत्साहात संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मा. श्री चंद्रकांतजी साळुंके -'संचालक सरस्वती विद्यालय,लातूर' यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विश्व पॅलेसचे संचालक विश्वनाथ जी म्हेत्रे हे होते. मान्यवरांचे स्वागत कोषाध्यक्ष श्री. तानाजी बेवनाळे पाटील व प्रा. उमेश जी गिरवलकर यांच्या हस्ते संपन्न झाले. स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक संस्था सचिव गंगाधर आरडले यांनी केले.

## छत्रपती शिवरायांच्या विचारावर विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे वाटचाल करावी : अरूणाताई कांदे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती देशभरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. छत्रपती शिवरायांनी वयाच्या १६ व्या वर्षी स्वराज्य स्थापनेची शपथ घेऊन मोजक्या मावळ्यांच्या मदतीने अत्यंत कमी कालावधीत स्वराज्याची निर्मिती केली. त्यांच्या या कार्यातून छत्रपती शिवरायांचे शौर्य, धैर्य आणि स्वराज्य स्थापनेसाठी त्यांनी गणिमीकावा पध्दतीने केलेला संघर्ष आपल्यासमोर उभा राहतो. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवरायांचे विचार आत्मसात करून त्या विचारावर यशस्वीपणे वाटचाल करावी, असे आवाहन स्वामी दयानंद विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अरूणाताई कांदे यांनी केले. यावेळी त्या जेएसपीएम संचालित स्वामी दयानंद विद्यालय, कव्हा येथे छत्रपती शिवरायांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी या कार्यक्रमाला बाबा कदम, दिपमाला मस्के, शिवशरण थंबा, श्रीकांत भिसे, आक्कलदिवे, तुरेवाले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना अरूणाताई कांदे म्हणाल्या की, छत्रपती शिवरायांचे जीवन हे केवळ पराक्रमाचे प्रतीक नसून ते धैर्य, न्याय, कर्तव्यनिष्ठा आणि स्वाभिमानाचे जिवंत विद्यापीठ आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून राष्ट्रप्रेम, संघटनशक्ती आणि स्त्री-सन्मान यांसारख्या मूल्यांचा आदर्श घ्यावा. संकटे कितीही मोठी असली तरी चिकाटी, दूरदृष्टी आणि प्रामाणिकपणा यांच्या बळावर यश मिळविता येते, हे शिवरायांनी दाखवून दिले. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आयुष्यात किमान एक तरी गुण शिवरायांकडून आत्मसात करून तो कृतीत उतरवावा, तेव्हाच जयंती साजरी करण्याचा खरा अर्थ पूर्ण होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराज यांची जयंती तालुका काँग्रेस व शहर काँग्रेसच्या वतीने साजरी



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. १९ फेब्रुवारी :** हिंदवी स्वराज्य संस्थापक, अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त रेणापूर तालुका व शहर काँग्रेस च्या वतीने जयंती रेणापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे साजरी करण्यात आली .

वेळी लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद आबा जाधव, रेणापूर तालुका अध्यक्ष प्रमोद कापसे, शहरध्यक्ष पद्मसिंह पाटील, नगरसेवक गजेंद्र चव्हाण, सचिन मोटेगावकर, भूषण पनुरे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती. उमाकांत खलंग्रे, बाजार समितीचे संचालक. प्रकाश सूर्यवंशी, ॲड.तानाजी कणसे, बिबीशन कदम, ॲड.महेश राजे, बाजार समिती सचिव उत्तम चक्रे, केशव माने, प्रदीप काळे, शहाजी पवार, रघुनाथ मदने, दयानंद सुरवसे, चेतन एकुरके, पंडित माने रहीम पठाण, महेश सावंत, सतीश चव्हाण, गोविंद पवार, विनोद खंदाडे, उध्दव जाधव, शिवराज स्वामी, अमोल गोडभरले, दिलीप उरगुडे, डि के शिंदे, गोविंद जाधव यांच्या सह काँग्रेस कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्याने जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर शिक्षण क्षेत्रात यश प्राप्त करा : प्रा. डॉ. मोटेगावकर



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. १९ फेब्रुवारी :** जीवनामध्ये दहावी आणि बारावीची वर्षी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगून शालेय आणि महाविद्यालयीन जीवनामध्ये नेत्रदीपक यश प्राप्तीसाठी देहभान विसरून विद्यार्थ्याने जिद्द, चिकाटी, कठोर मेहनत आणि परिश्रमाच्या जोरावर शिक्षण क्षेत्रात नेत्रदीपक यश प्राप्त करावे असे आग्रही प्रतिपादन लातूरच्या आर सी सी चे संचालक प्रा. डॉ. शिवराज मोटेगावकर यांनी केले.

ते दि. १८ रोजी यशवंत विद्यालयात आयोजित दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गजानन शिंदे, व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. दिनेश तोंडारे, उप मुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक राम तत्तापुरे, शिवाजी सूर्यवंशी ,प्रा. रवी ईरफळे, खय्युम शेख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना प्रा. डॉ. शिवराज मोटेगावकर म्हणाले की, जीवनात यशाची पहिली पायरी म्हणजे स्वतःची ओळख असून प्रामाणिक आत्मविश्र्वासाने अभ्यासामुळे जीवनात गती मिळून सन्मान मिळतो. आई-वडील गुरुजी यांचा कायमस्वरूपी सन्मान करा असे जाहीर आवाहन केले.

यावेळी दहावीचे विद्यार्थी प्रणव चोचंडे, माधुरी मुंडे, वैष्णवी फड, दिपाली अंभोरे, श्रेया तत्तापुरे यांचे मनोगत पर भाषणे झाली.

## सहा महिन्यापूर्वी केलेल्या रस्ता कामाची दयनीय अवस्था

### - कोपरा गावाअर्तंगत रस्ता वर्षाच्या आतच गेला उखडून - भरमसाठ पैसे खाऊन गुत्तेदार करतोय मज्जा ; शासनाचे लाखो रुपये पाण्यात

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव, दि. १९ फेब्रुवारी :** अहमदपूर तालुक्यातील कोपरा येथील सहा महिन्यापूर्वी केलेला सिमेंट रस्ता उखडून गेल्याने रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे. या कामासाठी आमदार फंडातील स्थानिक निधी व पंधराव्या वित्त आयोगातील निधी वापरण्यात आला आहे. शासनाने गाव पातळीवरील अंतर्गत रस्त्यासाठी दलित वस्ती सुधार योजना, वित्त आयोग निधी असो किंवा जन सुविधा विकास निधी अंतर्गत उपक्रम असो ग्रामीण नागरिकांच्या विकासासाठी मजबूत रस्ता तयार व्हावा व नागरिकांच्या रस्त्याच्या अडचणी दूर करण्यासाठी शासकीय तिजोरीमधून लाखों रुपये खर्च केले जातात. परंतु सुविधे साठी वापरण्यात आलेला निधी नागरिकांच्या अडचणी ठरू लागल्या आहेत. कोपरा गाव अर्तंगत रस्त्याचे बांधकाम सहा महिन्यापूर्वी करण्यात आले होते. वर्षाच्या आतच रस्ता उखडून गेला असून येथील नागरिकांमध्ये शासकीय कामाबाबत संताप व्यक्त केला जात आहे.



त्यामुळे लाखों रुपये शासकीय निधीची केवळ धुळ बनल्याने नागरिकांच्या अडचणीत पुन्हा वाढ झाली आहे.

ठेकेदाराने या रस्त्याच्या कामासाठी निकृष्ट दर्जाचे मटेरियल वापरल्याने रस्त्यावरील विअरिंग चा थर उखडून गेला आहे असे मत येथील गावकऱ्यांनी व्यक्त केले. त्यामुळे उडालेल्या धुराळ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

असे अनेक कामे या ठेकेदाराने केले आहेत व त्यांच्या रस्त्याच्या बांधकामांचा स्तर घसरला असल्याची चर्चा होत असून अशा ठेकेदारांना शासनाने काम देणे बंद करावे अशी चर्चा नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

## सभ्य आणि सुसंस्कृत समाज निर्माण झाला पाहिजे : डॉ. नागोराव कुंभार

### कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. १९ फेब्रुवारी :** माणूस घडविण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण परंतु आज याकडे मात्र उद्योग म्हणून पाहिले जाते, हे थांबले पाहिजे. निष्ठा व कर्मभावानेने प्रत्येक व्यक्तीने काम केले तर ही परिस्थिती बदलू शकते. विद्यार्थ्यांना वैचारिक आधार व दिशा देण्याचे काम शिक्षकच करू शकतात. आपल्या अवतीभवती काय आहे ते समजून घ्यावे, तज्ञ लोकांशी संवाद साधावा, भरपूर वाचन करावे, वाचून/ ऐकून जे ज्ञान मिळवले त्याचे चिंतन करावे ही ज्ञानाची साधने तरुण पिढीला समजून सांगितली पाहिजे. विद्यार्थ्यांची क्षमता लक्षात घेऊन त्यानुसार त्यांना ज्ञान दिले पाहिजे, तरच सभ्य आणि सुसंस्कृत समाज निर्माण होईल असे परखड मत थोर विचारवंत,



शिक्षणतज्ञ डॉ. नागोराव कुंभार यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेबांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते, या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंपताना डॉ.नागोराव कुंभार यांनी हे मत व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, तरुण पिढीशी संवाद झाला तरच त्यांच्यावर चांगले संस्कार होऊ शकतात. ज्ञान, शहाणपणा, आत्मविश्र्वास, संयम हे सद्गुण प्रत्येकात आवश्यक आहेत हे तरुण पिढीला सांगावे लागतील.

कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेबांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कर्मवीर कदम यांची उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी, विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती विकसित झाली पाहिजे असे मत व्यक्त केले. शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान नाही तर व्यक्तिमत्व विकासाची प्रणाली आहे असेही ते म्हणाले. याप्रसंगी विचार मंचावर महाराष्ट्र शिक्षण समितीचे समन्वयक श्री. दिलीपराव धुमाळ, महाराष्ट्र औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ, महाराष्ट्र पॉलिटेक्निक डी फार्मसीचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर पाटील, महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. मोहन नटवे, महाराष्ट्र प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक श्री. लिंबराज मलिले, महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रशांत गायकवाड यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. नरेश पिनमकर, डॉ. गोविंद शिवशेट्टे यांनी तर आभार डॉ. हंसराज भोसले यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शिक्षण समिती संकुलातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक

## भजनी मंडळ, शिवशंभो ढोल ताशे मंडळ, बंजारा नृत्य, मुलामुलींचे प्रात्यक्षिकांनी वेधले सर्वांचे लक्ष





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ फेब्रुवारी**
सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने शिवजन्मोत्सवानिमित्त दि १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत भजनी मंडळ, महिला, मुलींचे शिवशंभो ढोल ताशा मंडळ, मुलामुलींची चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.




सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रिडा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि १९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला तसेच समितीच्यावतीने मोठ्या थाटात शिवजन्मोत्सव पारंपारीक पध्दतीने साजरा करण्यात आला. यावेळी समितीच्या अध्यक्षा सुनीताताई मुळे, सचिव रजनी पाटील, उपाध्यक्षा विद्या पवार, अर्चना जाधव, कांताबाई कल्याणकर, अनिता सुर्यतळ, डॉ रमेश शिंदे, यांच्यासह खंडेराव सरनाईक, मनोज आखरे, सुनील पाटील गोरेगावकर, त्र्यंबकराव लोंढे, ॲड उल्हास पाटील, ॲड अमोल जाधव, नगरसेविका वैशाली गोटे, कल्याण देशमुख, भूषण देशमुख शिवाजी मेटकर समितीतील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, शिवसेनचे आ. संतोष बांगर, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, ॲड के के शिंदे, राम कदम, प्रकाश इंगोले यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर अतिशय शिस्तबध्द पध्दतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची मिरवणूक शहरातील इंदिरा गांधी चौक, महात्मा गांधी चौक, जवाहर रोड, पोस्ट ऑफीस रोड, शिवाजी महाराज चौकापर्यत काढण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सर्व परिसर भगवामय झाल्याचे दिसत होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत घोड्यावर बसलेले तरूण मिरवणूकीच्या सुरूवातीला दिसत होते. मिरवणुकीत मुलामुलींनी काठी, दांडपट्टा तसेच इतर चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. तसेच वारकरी सांप्रदायाकडून भजनी मंडळाने या मिरवणूकीत सहभाग नोंदवला होता. यावेळी बंजारा महिलांनी पारंपारीक नृत्य सादर करीत मिरवणूकीत सहभाग नोंदवला तर महिला आणि मुलींचे ढोल पथक सर्वांचे आकर्षण ठरले होते.

तरूणांनी मोटारसायकल रॅली काढीत छत्रपती शिवरायांचा जयघोष केला. यावेळी विविध सामाजिक संघटना तसेच दानशूरांनी मिरवणुकी सहभागी कार्यकर्त्यांसाठी चहा, फराळ तसेच पाणी यांची व्यवस्था केली होती. मोठ्या संख्येने शिवप्रेमी मिरवणूकीमध्ये सहभागी झाले होते. पोलिस अधीक्षक निलभ रोहन यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मिरवणूकीसाठी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# नगरपालिका विशेष सभेत विकासाच्या निर्णयांना हिरवा कंदील

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १९ फेब्रुवारी**
शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने दि. १८ फेब्रुवारी रोजी नगरपरिषद सभागृहात विशेष सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अध्यक्षा सौ. सुनिता मनमोहन बाहेती या होत्या.

सभेत शहराच्या विकासाशी निगडित अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात आले. नगरपरिषद हद्दीतील जुने शासकीय गोदाम निष्कासित करून त्या ठिकाणी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असे भाजीपाला मार्केट उभारण्याचा ठराव चर्चेनंतर मान्य करण्यात आला. या निर्णयामुळे स्थानिक शेतकरी व व्यापाऱ्यांना आधुनिक बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

तसेच नगरपरिषदेच्या मालकीच्या सतीपांग्रा, दगडगाव रस्ता व सिद्धेश्वर पंपिंग स्टेशन येथे सोलार प्लांट उभारण्यासंदर्भातही सकारात्मक निर्णय घेण्यात आला. यामुळे वीज बचत होऊन नगरपरिषदेच्या खर्चात बचत होणार असल्याचे मत सदस्यांनी व्यक्त केले.

शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी वार्षिक निविदा मागविणे तसेच डंपिंग ग्राउंडवरील कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी बायोमायनिंग प्रक्रिया राबविण्याबाबतही चर्चा करून निर्णय घेण्यात आला. स्वच्छ आणि हरित वसमत घडविण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शहरातील मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी ॲनिमल बर्थ कंट्रोल सेंटर व केनेल स्थापन करण्याबाबतही सभेत मान्यता देण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षेसोबतच प्राणीसंवर्धनाचा समतोल राखण्याचा प्रयत्न यामधून होणार आहे. याशिवाय चतुर्थ वार्षिक कर मूल्यांकनानुसार आकारणी, विविध विभागांसाठी आवश्यक साहित्य खरेदीसाठी वार्षिक निविदा, शहरात आवश्यक त्या ठिकाणी वाहतूक सिग्नल, सीसीटीव्ही व एकतर्फी वाहतूक व्यवस्था लागू करणे, पाणीपुरवठा केंद्रावर व्होल्टेज स्टॅबिलायझर बसविणे व नवीन मोटार खरेदी, शॉपिंग कॉम्प्लेक्स वसुलीमध्ये सुसूत्रता आणणे तसेच जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ अंतर्गत विविध विकास कामांचे प्रस्ताव पाठविणे आदी विषयांवरही सकारात्मक निर्णय घेण्यात आले.

सभेत सर्व सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून शहराच्या विकासासाठी एकमुखी भूमिका घेतल्याचे चित्र पाहायला मिळाले. या निर्णयांमुळे वसमत शहराच्या विकासाला नवे बळ मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.



**हिंगोली- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्यावतीने महिलांसाठी होम मिनीस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा सौ रेखा बांगर यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी समितीच्या पदाधिकारी उपस्थित होत्या. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



हिंगोली- येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्राचे धर्मवीर, स्वराज्याचे स्वप्न पाहणारे, छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती १९ फेब्रुवारी रोजी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या शुभहस्ते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार व पुष्पगुच्छ अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य प्रो. डॉ. संजीवकुमार नरवाडे, उपप्राचार्य प्रा. डॉ. सुरेंद्र साहू, पर्यवेक्षक प्रा. धनंजय जोशी, स्टाफ सचिव प्रा. डॉ. सचिन हाटकर, प्रो. डॉ. पांडुरंग गंगासागरे, प्रा. डॉ. राजाराम पिंपळपल्ले, प्रा. डॉ. गजानन चव्हाण, प्रा. डॉ. विलास पवार, प्रा. डॉ. अण्णाजी मडावी, प्रा. डॉ. बस्वराज लक्षटे, प्रा. डॉ. प्रशांतकुमार जोशी, प्रा. डॉ. सोनलकुमार नगरकर, प्रा. डॉ. सुभाष पोले, प्रा. पंडित कुराडे, प्रा. धृपदहारे, प्रा. अरविंद गाडे, प्रा. राम तोडकर, प्रा. निलेश उबाळे, प्रा. आनंदा बेले, प्रा. प्रशांत वानखेडे, प्रा. वंदना तावडे, शामराव ठोंबरे, दिपक कंठाळे, शेख जावेद शेख, गजानन यादव इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हाटकर यांनी केले.

### शिवजयंतीनिमित्त आरोग्य तपासणी शिबीर



हिंगोली- तालुका आरोग्य अधिकारी यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातील गांधी चौकात मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेकांनी या आरोग्य शिबीराचा लाभ घेतला. सकाळपासूनच शिबीरात तपासणी करण्यासाठी लोकांनी गर्दी केली होती. यावेळी माजी तालुका आरोग्य अधिकारी डॉ नामदेव कोरडे, वैद्यकीय अधिकारी मनिषा गायकवाड, औषध निर्माण अधिकारी शुभम पाटील, संतोष खडसे, प्रदीप आंधळे, गौतम खंदारे यांच्यासह आशावर्कर यांनी शिबीरात रूग्णांची तपासणी केली. या शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# राकेश भट्ट यांना बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ फेब्रुवारी**
आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र शासनाकडून राज्यस्तरावर आदरणीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार दिला जातो. या संदर्भात २०२४ सालचे पुरस्कार जाहीर करण्यात आले असून त्यात दैनिक भास्करचे जिल्हा वार्ताहर राकेश भट्ट यांना महाराष्ट्र शासनातर्फे आरोग्य क्षेत्रात दिला जाणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. रविवार, २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मुंबईतील स्व.यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि



सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना आदरणीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार दिला जातो. आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्था, डॉक्टर, पत्रकार आणि प्रादेशिक कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो. आरोग्य अभियान यशस्वी करणे, ती प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे, आरोग्यविषयक कामे यशस्वीपणे राबवणे आणि लोकसहभागातून विविध आरोग्य कार्यक्रम यशस्वी करणे हा या पुरस्काराचा उद्देश आहे. पुरस्कार म्हणून एक लाख रुपये रोख, पदक आणि प्रमाणपत्र दिले जाते. सन २०२४ चा आदरणीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न राज्यस्तरीय पुरस्कार. २०२४ या वर्षासाठी हिंगोली शहरातील रहिवासी पत्रकार राकेश भट्ट यांना पत्रकारिता क्षेत्रातील हा पुरस्कार देण्याची अधिकृत घोषणा डॉ. कैलाश बाबिस्कर, राज्य आरोग्य सेवा, पुणे विभागाचे उपसंचालक यांनी १८ फेब्रुवारी रोजी केली.

# मिनी सरस प्रदर्शनी व विक्री महोत्सवाचा समारोप, प्रमाणपत्रांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ फेब्रुवारी**
येथील बहुविध प्रशालेच्या मैदानावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या मार्फत महिला बचत गटाच्यावतीने मिनी सरस प्रदर्शनी व विक्री महोत्सवाचे आयोजन मागील पाच दिवसापूर्वी करण्यात आले होते. या महोत्सवाचा दि १९ फेब्रुवारी रोजी समारोप करण्यात आला.



सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपतींच्या प्रतिमेस मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, लेखाधिकारी माडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती दिवाणे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रदर्शनीमध्ये अनेक महिला बचत गटांनी सहभाग घेत विविध प्रकारच्या वस्तूंचे स्टॉल लावले होते. या प्रदर्शनीला नागरिकांनी प्रतिसाद दिला. मागील चार ते पाच दिवसात महिला बचत गटाच्या वस्तूंची चांगली विक्री झाली आहे.

समारोपीय भाषणात मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी मार्गदर्शन करतांना महिला बचत गटांनी उत्कृष्ट काम केल्याबद्दल अभिनंदन केले तसेच बचत गटाच्या माध्यमातून सक्षमीकरण, स्वावलंबी व्हावे. शासन महिला बचत गटांना सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. यावेळी मान्यवरांच्याहस्ते प्रदर्शनी महोत्सवात सहभागी सर्व महिला बचत गटांना प्रमाणपत्रांचे वाटपही करण्यात आले.

# औंढ्यात हजारो भाविकांच्या उपस्थितीत रथोत्सव सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ फेब्रुवारी**
'हर हर महादेव, बम बम भोले, नागनाथ महाराज की जयच्या जयघोषामध्ये बुधवारी (ता. १८) रात्री महाशिवरात्री यात्रेनिमित्त नागनाथ मंदिरामध्ये हजारों भाविकांच्या उपस्थितीत रथोत्सव साजरा झाला. महाशिवरात्रीच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण असणारा रथोत्सव असल्याने दुपारपासूनच हजारो भाविकांची गर्दी होती.



फुलांच्या माळा आणि दिव्यांद्वारे सजावट केलेल्या रथामध्ये श्री नागनाथांची उत्सवमूर्ती ठेवण्यात आली होती. रात्री दहाच्या सुमारास मंदिराभोवती रथाच्या प्रदक्षिणेला सुरुवात झाली. अशा पाच प्रदक्षिणा झाल्या, यावेळी उपस्थित भाविकांनी 'हर हर महादेव, ओम नमः शिवाय, नागनाथ महाराज की जय, बम बम भोले'चा गजर केला. नागनाथ मंदिर कर्मचारी यांनी रथ ओढला. देवस्थान अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे यांच्या हस्ते 'श्री' ची पूजा झाली. अपर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, नगराध्यक्ष कपिल खंदारे, उपनगराध्यक्ष मनोज देशमुख यांच्यासह विश्वस्त ॲड श्रीधर घुगे, देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ,मुख्यपुजारी तुळजादास भोपी, हरिहर भोपी, दीपक कोळी, एन बोडखे, नागनाथ गुरव, रामेश्वर गुरव, बबन सोनुने ,राम कदम, पत्रकार बाळासाहेब साळवे, दत्तात्रय शेगुकर, गजानन नाईक,विलास काचगुंडे आदीसह जवळपास दोन लाखांहून अधिक भाविक उपस्थित होते.

दरम्यान, १९४८ मध्ये झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला होता. यात गणपत ऋषी,शंकर पाठक, रंगनाथ सुरवाडकर, तसेच २०११ मध्ये सतीश पाठक यांचे रथ मिरवणुकीत अपघाती निधन झाले होते. त्यांनाही यावेळी आदरांजली अर्पण करण्यात आली. रथोत्सवात भजनी मंडळ व बँडपथक तसेच ढोल-ताशांसह सहभागी झाले होते. उपविभागीय पोलिस अधिकारी कुंदनकुमार वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार केंद्रे यांच्यासह पोलिस निरीक्षक जी एस राहिरे, सपोनी कैलास भगत, उपनिरीक्षक दत्ता कानगुले अमोल इंगोले, पंजाबराव थिटे, खुदुस शेख, अफसर पठाण, यशवंत गुरुपवार, सुभाष जैताडे, रविकांत हरकाळ, वसीम पठाण यांच्या पोलीस कर्मचारी, होमगार्ड, एसआरपी पथक, बीडीडीएस पथक, एटीएस पथक, दंगा नियंत्रक पथक आदींनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# होम मिनीस्टरला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ फेब्रुवारी**
छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक महोत्सव समितीच्यावीने महिलांसाठी होम मिनीस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे नगराध्यक्षा रेखा बांगर यांचेहस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुण्या म्हणून सुषमा कदम, राजामती मुटकुळे यांची उपस्थिती होती. स्पर्धेतील विजेत्या तीन स्पर्धकांना मानाच्या तीन पैठण्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी सचिव रजनी पाटील, उपाध्यक्षा विद्या पवार, उषा इंगोले, अर्चना जाधव, साधना हेंबाडे, अरूणा अंभोरे, सीमा वडतकर, अलका लोखंडे, सीमा भिसे, विद्या पतंगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जय जिजाऊ...जय शिवरायाच्या घोषणांनी दुमदुमले शहर






**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, १९ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज शहरात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शिवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण ओसंडून वाहताना दिसून आले.

शिवजयंती निमित्ताने प्रमुख मार्गासह अन्य रस्त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचे बॅनर लावण्यात आले. छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्यासाठी नांदेड शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिर, अन्नदान, व्याख्यान आदी सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. दुचाकी रॅली, भगवे झेंडे हातात घेऊन छत्रपती शिवरायांचा जयघोष करत आपल्या राजाला अभिवादन करण्यासाठी त्यांच्या पूर्णाकृती अश्वारूढ पुतळ्याकडे जाताना दिसत होते. सकाळीच आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, महापौर कविता मुळे, उप महापैर दिपकसिंह रावत जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, माजी आ. सुभाष साबणे, माज आ. अविनाश घाटे, मनपा आयुक्त महेश डोईफोडे, विनय गिरडे, उमेश मुंडे, माधव पावडे, क्षितिज जाधव, दिलीपसिंह सोडी, यांच्यासह अनेकांनी अभिवादन केले. शहरात सर्वत्र भगवेमय वातावरण पसरले. या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, पोलीस निरिक्षक परमेश्वर कदम हे बारकाईने लक्ष ठेवून होते. मोठ्या प्रमाणात जागोजागी बंदोबस्त तैनात करण्यात आला.

## वस्तीगगहातील सुरक्षारक्षक, कर्मचाऱ्यांचा एल्गार



**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. १९ फेब्रूवारी-**

उमरी समाज कल्याण मागास्वर्गीय मुला - मुलीच्या वस्तीगृह शाळेत वरिष्ट अधिकाऱ्याचे अंकुश नसल्याने आंधळ दळतय कुत्र पिठ खातय अशी अवस्था निर्माण झाली आहे कंपनीचे गुत्तेदार तुपाशी आणि उमरी येथे बाह्यस्तोत ( आऊट सोर्स ) कर्मचारी मात्र उपाशी असल्याने संयुक्त कर्मचारी यांनी या बद्दल एल्गार करून थेट मुख्यमंत्री , सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अधिकारी नांदेड यांच्याकडे तक्रार करून न्यायाची दाद मागीतली आहे .

उमरी डॉ बाबासाहेब आंबेडकर मुला- मुलींचे वसतीग्रह शाळा आहे या वस्तीगृहात निकृष्ट दर्जाचे व दैनेदिन चॉर्ट प्रमाणे नियमानुसार जेवळ मिळत नाही अशा अनेक वेळा तक्रारी झाल्या पण गेल्या अनेक वर्षापासुन बाह्यस्त्रोत ( आऊटसोर्स ) कर्मचारी समाज कल्याण विभागात कार्य करतात , यापूर्वी क्रिस्टल इंडिग्रेटेड सविव्हेस लिमिटेड मुंबई , बी व्ही जी इंडिया लिमिटेड कंपनी पुणे सध्या माहे ऑगस्ट २०२५ पासुन सर्व कर्मचारी स्मार्ट सर्व्हिसेस प्रा लि पुणे या कंपनी अंतर्गत समाज कल्याण विभाग वस्तीगृह व निवाशी शाळेत येथे काम करतात अशा कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यावर तुंटपुजी पगार देवून त्या मध्ये कपात करणे , वेळेवर पगार न देणे , कर्मचारी यांचा पगार पत्रक वेळेनुसार बंधनकारक असतांना ही यापुर्वीच्या कंपनीनी स्मार्ट सर्व्हिसेस प्रा लि पुणे कंपनीनी ने पगार पत्रक दिले नाही इतर बिले त्यांच्या सोयीनुसार बिले अदा होतात विशेषता १२ वर्षापासून सुरक्षा रक्षक कर्मचारी महिण्यात एकही सुट्टी नाही किवां साप्ताहिक असेल अधिकृत सुट्टीची तरदूद नाही अशा अरोप कर्मचारी यांनी निवेदनात तरतुद केली आहे .

कंपनीच्या सुरक्षा रक्षक यास ३१ दिवसाचा निव्वळ पगार १४ हजार १०० मिळत होता परंतू आता स्मार्ट सर्व्हिसेस कंपनी पुणे कंट्राकी गुतेदार सुरक्षारक्षक -साईड अटेन्डंट यांचा ३१ दिवसाचा माहे ऑगस्ट २०२५ साठी निव्वळ पगार १२ हजार ८०० मिळत आहे सुट्टी नाही , वाढीव पगार नाही पुन्हा कपातीचे धोरण हा मजबुरीचा फायदा व अन्यायकार बाब आहे , सफाई कामगार यांची ही तिच अवस्था आहे समाज कल्याण विभागा अंतर्गत बाह्यस्त्रोत ( आरुटसोर्स ) कर्मचारी हे बहुतांश मागास्वर्गीय आहेत मागास्वर्गीयाना मदत करणारे समाज कल्याण विभाग जनकल्यानेचे योजना , विद्यार्थीची गरजा हा प्रश्न तर दुरावतोच पण ज्या विभागात कर्मचारी यांना कर्तव्यावर राहून सुट्टी न घेता मरमर करावी लागते ? याच्यांकडे राज्याचे मुख्यमंत्री , समाज कल्याण आयुक्त लक्ष देण्याची गरज वाटत नाही काय ? कर्मचारीच वर्षानुवर्ष पगार , सुट्टी विना त्रास सहन करत असतील तर समाज कल्याण विभागामार्फत विद्यार्थीसाठी मिळणारे योजना हे तरी त्यांच्या शैक्षणिक कालवधित मिळतात काय ? या सर्व बाबीकडे गांभीर्यता घेवून आयुक्तांनी कर्मचारी यांच्या सोडवून त्यांना न्याय द्यावा अन्यता ठोक मानधानावर नियुक्ती करावी अशी मागणी - कर्मचारी बालाजी बाबुराव सांवत गोरठेकर , ओमप्रकाश बालाजी नार्लेवाड , मनोज मारोती लाडके , प्रभाकर पुंडिलक डोंगरे , प्रविण प्रल्हाद मदेवाड आदी कर्मचारी यांनी सर्व मंत्री मोहदय व शासकीय वरिष्ट अधिकारी यांना निवेदन देवून अंदोलनाचा इशारा दिला आहे .

## किनवट शहरात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १९ फेब्रूवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त किनवट शहरात विविध उपक्रमांच्या माध्यमातून जयंती हर्षो ल्हासात साजरी करण्यात आली. शिवप्रेमींच्या मोठ्या उपस्थितीत ध्वजारोहण, अभिवादन, रक्तदान शिबिर, चित्रकला, रंगभरण, भाषण व निबंध स्पर्धा तसेच भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



जयंतीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. साक्षी वाडगुरे या विद्यार्थिनीने रांगोळीच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे आकर्षक चित्र साकारून उपस्थितांचे लक्ष वेधले. शहरातून काढण्यात आलेल्या मोटारसायकल रॅलीमुळे वातावरणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराजांना अभिवादन करण्यात आल्यानंतर नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमास प्रतिष्ठित नागरिक व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याच ठिकाणी आयोजित रक्तदान शिबिरालाही नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या शिबिरात पोलीस निरीक्षक गणेश कराड, पोउपनि सागर झाडे, पोह प्रदीप अत्राम, पो.अ. सुनिल अन्नमवार यांच्यासह एकूण ५१ जणांनी रक्तदान केले.

दरम्यान, नगर परिषद किनवट येथेही शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. नगर परिषद सभागृहात आयोजित मुख्य कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांच्या हस्ते करण्यात आले, तर राष्ट्रवादी नेत्या बेबीताई नाईक, क्रांती केराम,अशोक पाटील सुर्यवंशी,ख सागर शिंदे, साजीद खान, अनिल तिरमनवार, आनंद मच्छेवार, अमरदिप कदम, सतिष नेमानीवार, नारयण सिडाम, व्यंकट नेमानीवार, बालाजी फड, रमेश कदम, गंगुबाई परेकर आदी उपस्थित होते. प्रारंभी शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. जय शिवाजी, जय शिवरायच्या घोषणांनी सभागृह दुमदुमून गेले. नगरपरिषद येथे मुख्याधिकारी मुगाजी काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

## कार - दुचाकीची समोरासमोर धडक ; दोघांचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १९ फेब्रूवारी-**

तालूक्यातील सरसम बु. फाट्याजवळ कार दुचाकीची समोरासमोर धडक,या दुर्घटनेत दुचाकीवरील एकजण जागीच ठार झाला आहे. तर एकाला उपचारासाठी नांदेडला नेत असतांना अर्ध्यारस्त्यातच त्याचाही दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हि घटना दि. १९ फेब्रूवारी गुरूवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास घडली आहे.



नांदेड,किनवट राज्य महामार्गावर हिमायतनगरकडून चारचाकी वाहन टाटापंच एम. एच. २६ सि.पी. ५०८० ही भोकरकडे जात होती. त्याच दरम्यान् भोकरकडून दुचाकी एम. एच. २६ बी. एम. ८८९४ ही हिमायतनगरकडे येत होती. सरसम बु. बसस्टँन्ड जवळ दुसर्या एका वाहणाला ओव्हरटँक करण्याच्या नादात चारचाकी व दुचाकीची समोरासमोर जबरदस्त धडक झाली. या दुर्घटनेत दुचाकीवरील गजानन पांचाळ वय अंदाजे ४० रा. सरसम बु. ता. हिमायतनगर यांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दुचाकीवरील शंकर पंडीतराव सर्जे ( देशमूख ) वय ५५ रा. सरसम बु ता. हिमायतनगर यांचा जखमी अवस्थेत उपचारासाठी नांदेडला नेत असतांना रस्त्यातच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. घटनास्थळी हिमायतनगरचे पोलीस दाखल होवून पंचनामा केला आहे. दरम्यान् एकाच गावातील दोघाचा अपघातात मृत्यू झाल्याची बातमी पंचक्रोशित वार्यासारखी पसरली. या घटने बाबत हिमायतनगर पोलीस ठाण्यात चारचाकी वाहनधारकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## विश्वशांती बुद्ध विहारामध्ये शिवजयंती साजरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ फेब्रूवारी-**

नांदेड दक्षिण मधील तसेच लोहा तालुक्यातील सोनखेड सर्कल अंतर्गत येत असलेल्या, विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी ३९६ वी शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संरक्षण सचिव तथा आकाशवाणी प्रासंगिक निवेदक आनंद गोडबोले, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा अध्यक्ष सुरेश गोडबोले, सरपंच साहेब शिखरे,सरपंच माधव पावडे, सामाजिक कार्यकर्ते अंकुश शिखरे, मा. ग्रा. प. सदस्य बापूराव पाटील गवळी, शिवसेना सर्कल प्रमुख नामदेव शिखरे, रमाई जयंती मंडळाच्या अध्यक्षा भारतबाई निखाते, तंटामुक्ती अध्यक्ष मिलिंद गोडबोले, आरपीआय कार्यकर्ते धनराज गोडबोले,शंकर शिखरे, मदन शिखरे, राजू शिखरे, ज्ञानेश्वर शिखरे, मारुती चक्रधरे, समता सैनिक दलाचे अहेलाजी गोडबोले,शवाजी शिखरे, किरण शिखरे, यांची उपस्थिती होती.

## मॉर्निंग क्रिकेट क्लब व बॉल बॅडमिंटन ग्रुपच्या वतीने शिवजयंती साजरी



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ फेब्रूवारी-**

शहरातील भगीरथ नगर येथील मैदानावर मॉर्निंग क्रिकेट क्लब व बॉल बॅडमिंटन ग्रुपच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. सर्व खेळाडूंनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून 'जय भवानी जय शिवाजी'च्या घोषणा दिल्या. तसेच मिठाई वाटप केली.

यावेळी खेळाडू उत्तम वाठोरे, डॉ. माधव लोकडे, प्रा. भाऊसाहेब वानखेडे, अशोक खेडकर, गजानन चव्हाण, प्रेशीत मद्रप, आशुतोष सरसे, गोविंद पवार, संतोष किलेकर, सुनील वाघमारे, सुरेश काशिदे, दत्ता साखरे, बाबाराव काळे, सचिन कांबळे आदीसह अन्य खेळाडू उपस्थित होते. तर सायंकाळी मॉर्निंग क्रिकेट क्लबच्या वतीने वर्कशॉप कॉर्नर येथे शिवप्रेमींना अन्नदान वाटप करण्यात आले.

## हातपंप दुरुस्तीसाठी संजय घोगरे यांचा पुढाकार

**नवीन नांदेड** -वाढत्या उन्हाची चाहूल लागताच नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा तुटवडा भासू नये, यासाठी 'माझा प्रभाग, माझी जबाबदारी' या संकल्पनेतून सिडको प्रभागातील पाणीपुरवठा यंत्रणा सज्ज करण्यात येत आहे.सिडको-हडको प्रभागातील अनेक दिवसांपासून बंद असलेले आणि नादुरुस्त हातपंप युद्धपातळीवर दुरुस्त करण्याचे काम आज पूर्ण करण्याचे काम संजय पाटील घोगरे यांनी हाती घेतल्याचे दिसून येते.



सिडको हडको प्रभाग क्रमांक २० मधील नागरिकांचा उन्हाळ्यात पाण्याची मागणी वाढते, अशा वेळी नळाद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यासोबतच हातपंप हा नागरिकांसाठी मोठा आधार असतो. हीच गरज ओळखून सिडकोतील नगरसेवकांनी प्रभागातील प्रत्येक कोपऱ्यात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली आणि जिथे हातपंप बिघडले होते, तिथे तातडीने दुरुस्ती पथक पाठवून ते सुरू केले.यावेळी बंद हातपंप पुन्हा सुरू करणे ,तांत्रिक बिघाडामुळे बंद असलेले हातपंप दुरुस्त करून ते पिण्यायोग्य पाण्यासाठी खुले करण्यात आले आहेत.नळाला येणारे पाणी वेळेवर आणि पुरेशा दाबाने मिळावे यासाठी जलवाहिनीची तपासणी करण्यात आली. प्रभागातील विविध भागात अजूनही दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असून, उन्हाळा तीव्र होण्यापूर्वी सर्व व्यवस्था सुरळीत करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे. नळाचा पाणीपुरवठा नियमित करण्यासोबतच प्रत्येक हातपंप सुरू राहावा, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, हीच माझी प्राथमिकता आहे. आसे नगरसेवक संजय घोगरे यांनी उपकर्म उपक्रमातून दाखवून दिले आहे. या प्रभागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, उन्हाळ्यापूर्वीच झालेल्या या नियोजनामुळे पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

## श्रमदानातून गार्डन स्वच्छता सेवाभावाचा सुंदर आदर्श

**नांदेड**-महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर नांदेड शहरातील आसना मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने विमानतळ रोड येथील गार्डन परिसरात श्रमदानातून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छता हीच सेवा या भावनेतून आयोजित केलेल्या या उपक्रमाला ग्रुपच्या सदस्यांचा अत्यंत उत्स्फूर्त आणि मनापासून प्रतिसाद मिळाला. या सेवाभावी उपक्रमाचे नेतृत्व ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते आणि आसना मॉर्निंग वॉक ग्रुपचे अध्यक्ष आनंदराव कल्याणकर यांनी केले.

## अखंड हिंदुस्थान च्या दैवताला फुलवळ येथे ठिकठिकाणी अभिवादन

**तभा वृतसेवा**
**फुलवळ, दि. १९ फेब्रूवारी-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक कुळवाडी भूषण श्रीमंत योगी राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त फुलवळ येथे ठिकठिकाणी प्रतिमेचे , पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समस्त ग्रामस्थांच्या वतीने सार्वजनिक जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक अभिवादन करण्यात आले. व उपस्थित नागरिकांना आनंदा पवार , दत्ता डांगे व गणेश मंगनाळे यांच्या वतीने महाप्रसाचे वाटप करण्यात आले.

काही दिवसांपूर्वी याच चौकाच्या चबूतऱ्याला एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने चबुतरा जमीनदोस्त झाला होता . परंतु त्याच ठिकाणी नव्याने चबुतरा उभारून छत्रपती शिवाजी महाराज चौकाचा फलक लावण्यात आला याच ठिकाणी आज शिवजयंती सोहळा पार पडला.

यावेळी आनंदा पवार, दत्ता डांगे, गणेश मंगनाळे, गंगाधर शेळगावे, धोंडीबा बोरगावे, सादख शेख, आमृता मंगनाळे, बसवेश्वर शेळगावे, संदीप मंगनाळे, श्रीकांत मंगनाळे, केदारेश्वर फुलवळे, बालाजी बोरगावे, नवनाथ बनसोडे, धम्मानंद जाधव, दिगंबर गलपवाड, दत्तात्रय मंगनाळे, कामजी मंगनाळे, परसराम पटणे, बालाजी देवकांबळे , होनाजी शेळगावे, संतोष सोमासे, गजानन डांगे, रब्बानी शेख, शहाबुद्दीन शेख, रंगनाथ पांचाळ, शिवानंद मंगनाळे, अक्षय पवार, तानाजी पवार, कृष्णा जेलेवाड, केदार देवकांबळे, हरी बसवंते, माधव गलपवाड, वेदांत कराळे , ओम कराळे , अंगद सोमासे , गजानन गंदलेपवाड सह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## नरसीत शिवजयंती जल्लोषात साजरी

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. १९ फेब्रूवारी-**

नायगाव तालुक्यातील नरसी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उत्साह, जल्लोष आणि शिवभक्तीच्या वातावरणात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जय भवानी, जय शिवाजीच्या गजरात शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार धम्मदीप भद्रे कांडाळकर यांच्या पुढाकारातून हा सोहळा नरसी चौकात पार पडला. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी, नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे नेते श्रावण पाटील भिलवंडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य माणिकराव लोहगावे, रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि विक्रम हराळे, पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे, डॉ. संतोष मोरे, डॉ. ज्ञानेश्वर जाधव, डॉ. धुपेकर, शेळगावचे सरपंच तथा प्रा. डॉ. मनोहर तोटरे, नरसीचे माजी सरपंच व्यंकटराव कोकणे, एन. डी. नरसीकर, ज्येष्ठ पत्रकार गंगाधर पाटील भिलवंडे, माधवराव बैलकवाड, गोविंद नरसीकर, गंगाधर गंगासागरे आदींची उपस्थिती लाभली.

अध्यक्षीय भाषणात श्रावण पाटील भिलवंडे यांनी शिवरायांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि न्यायनिष्ठ राज्यकारभाराचा गौरव करत युवकांनी शिवचरित्रातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. स्वराज्य ही केवळ राजकीय संकल्पना नसून जनतेच्या सन्मानाचे प्रतीक आहे. शिवरायांनी सर्वधर्मसमभाव आणि शिस्तबद्ध प्रशासनातून आदर्श राज्यकारभार घडविला, असे ते म्हणाले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनीही शिवरायांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रम शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार रामराव पाटील ढगे, परमेश्वर जाधव, चंद्रकांत पवार, शंकर टोकलवाड, संभाजी वाघमारे, सुभाष सुर्यवंशी, बिट जमादार चंद्रमनी सोनकांबळे यांच्यासह अनेक शिवभक्त उपस्थित होते. नरसी चौकात झालेल्या या शिवजयंती सोहळ्यामुळे परिसरात शिवमय वातावरण निर्माण झाले होते.

## बाऱ्हाळी येथे पादुका दर्शन सोहळा ; कथाकार निरंजन भाईजी यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी , दि. १९ फेब्रूवारी-**

जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान नाणीजधामच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत दि.२४ फेब्रुवारी बा-हाळी येथे पादुका दर्शन सोहळा निमित्त दि.१८ रोजी धर्म ध्वजाचे ध्वजारोहण प्रख्यात भागवत कथाकार निरंजन भाईजी महाराज आळंदी देवाची यांच्या हस्ते करण्यात आले.

दि.२४ फेब्रुवारी २६ रोज मंगळवारी बा-हाळी ता.मूखेड येथील भवानी पेट्रोल पंप चव्हाणवाडी रोड वर आयोजित जगद्गुरू रामानंदाचार्यजी नरेंद्राचार्यजी यांच्या सिध्द पादूका दर्शन सोहळा निमित्ताने दि.१८/२/२६ रोजी आळंदी देवाची येथील प्रख्यात भागवत कथाकार निरंजन



भाईजी महाराज यांच्या हस्ते धर्म ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून तेलंगणा उपपिठ व्यवस्थापक चेतनजी गिरमे,सौ.वैशालीताई चव्हाण (मा.जि.प.अध्यक्षा नांदेड), व्यंकटराव पा.गोजेगावकर (मा.शिक्षण सभापती जि.प.), राजन देशपांडे, अँड. मूरारजी देशपांडे, डॉ. बालाजी झेटकोडे,बालाजी पा.सकनूरकर, शाम भाऊ नागलगावे (जि.अध्यक्ष द.नांदेड) उपस्थिती होती. याप्रसंगी व्यंकटराव पा.गोजेगावकर म्हणाले की, जगद्गुरूश्री यांच्या संस्थानचे उपक्रम अतिशय समाज उपयोगी आहेत. महारक्तदान शिबीर, मरणोत्तर देहदान, अँम्बलंन्स सेवा , व्रक्ष लागवड व जोपासना, मोफत वैद्यकीय उपचार सेवा, मोफत ईंग्रजी माध्यमातून शिक्षण या सारख्या सेवा महाराष्ट्रा सह देशात अखंड चालू आहेत .

तेलंगणा उपपिठ व्यवस्थापक चेतन गीरमे यांनी संस्थानचे उपक्रम, सेवा,आध्यात्मिक ,सामाजिक सेवा या संदर्भात सखोल मार्गदर्शन केले.यावेळी प्रमुख अतिथिंनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ निखिल चव्हाण बालाजी गवते तर आभार साईनाथ कोटगीरे यांनी मानले

या वेळी श्रीनिवास कामशेट्टिवार,शिवशंकर पा.कलंबरकर,राम माचिनवार, हनमंतमामा वाडीकर,व्यंकट पा .उमाटे ,बालाजी सोमावार ,मारोती ईबितवार,सतीश महाजन ,साईनाथ दाचावार, दिलीप महाजन,साईनाथ कोटगीरे, उत्तम वाडीकर, शिवाजी गवते बालाजी पा.जाधव राम चव्हाण यांच्या सह पदाधिकारी, भक्त शिष्य उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर ता. धारूर जि. बीड चे कार्यालयात हिंदवी स्वराज्याचे सस्थापक राजाधिराज श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करनेत आली. प्रसंगी महाराजांचे प्रतिमेचे पुजन करून विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, दासराव मोरे, भागवतराव वगरे, नागोराव निर्मळ, अशोकराव पाटील, गनेश सोळंके, दत्तात्रय शेवाळे, नितिन सोळंके.

## अखेर एकाही बिअर बारला परवानगी दिली नाही - ॲड. अजित देशमुख

**बीड (प्रतिनिधी)** | बीड जिल्ह्यात अधिकृत नोंदणी असलेली जवळपास साडेबाराशे बियर बार, बिअर शॉपी, देशी दारू आणि होलसेल दारू विक्रीची दुकाने आहेत. अशा परिस्थितीत सामाजिक स्वास्थ्य बिघडवायचे नसेल तर नवीन दारू दुकानांना परवानगी देऊ नका, अशी मागणी करण्यात आल्यानंतर आजच्या बैठकीमध्ये एकाही बिअर बार ला मंजुरी दिली नसल्याची माहिती ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी दिली आहे. बीड जिल्ह्यात दारू दुकानांमुळे अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे आम्ही सातत्याने आतापर्यंतच्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे नवीन बियर बार लायसन देऊ नका, म्हणून मागणी करत असतो. दारूने नुकसान होऊ नये, हा त्या पाठीमागचा हेतू असतो. प्रलंबित असलेल्या अनेक अर्जांपैकी काही अर्ज आजच्या बैठकीमध्ये निकाली निघणार होते. बीड जिल्ह्यातील वाढती बेकारी आणि गुन्हेगारी लक्षात घेता समाज हितासाठी व्यसनाधीनता कमी होणे गरजेचे आहे. त्यामुळे ही मागणी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख यांचे कडे देखील करण्यात आली होती. आजच्या बैठकीमध्ये एकाही नवीन बियर बारला परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाला धन्यवाद देत सामाजिक स्वास्थ्य जपणे, ही प्रशासनाची जबाबदारी असल्याने हा निर्णय पुढेही कायम ठेवावा, असे ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

## कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात शिवजन्मोत्सव थाटामाटात संपन्न

**अंबड (प्रतिनिधी)** | दिनांक 19 फेब्रु.2026 रोजी शिवजयंती निमित्त कै. दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात शिवजयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आजच्या या कार्यक्रमासाठी व्यासपीठावरती भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या उपाध्यक्ष मा.सौ.ज्योतीभाभी दीपकसिंह ठाकूर तसेच प्रमुख उपस्थित शालेय व्यवस्था मंडळचे अध्यक्ष मा.श्री. व्यंकटेशजी गोसावी सर तसेच प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक मा.श्री.प्रदीप जोशी सर माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक मा.श्री.सुधाकर घायतडक सर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम प्रतिमा पूजन करण्यात आले . यानंतर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. आजच्या या कार्यक्रमानिमित्त चौथी अ चे विद्यार्थी मा जिजाऊ व शिवरायांच्या वेशभूषेमध्ये आले होते. आजच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रदीप जोशी सर यांनी केले. तसेच पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनपटावर आधारित रोमांचक असा उत्तम पोवाडा सादर केला. अध्यक्षीय समारोपात. बोलताना ज्योती भाभी म्हणाल्या की, शिवाजी महाराजांचे चरित्र महान आहे. आजच्या या काळामध्ये शिवरायांकडून प्रेरणा घेऊन आजच्या मुलींनी न घाबरता जीवनामध्ये संघर्ष केला पाहिजे.

## अवैध गावठी कट्ट्यासह विधीसंघर्ष बालक जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**बीड** | छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बंदोबस्तावर तैनात असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आज, १९ फेब्रुवारी रोजी एका विधीसंघर्ष बालकाला अवैध अग्नीशस्त्रासह ताब्यात घेतले आहे. बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात एक मुलगा कमरेला गावठी कट्टा लावून फिरत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून पथकाने तातडीने सापळा रचून संबंधित विधीसंघर्ष बालकाची झडती घेतली असता, त्याच्याकडे एक गावठी बनावटीचा कट्टा मिळून आला. या प्रकरणी पोलिसांनी अग्नीशस्त्र जप्त करून बालकाला शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या स्वाधीन केले आहे. संबंधित बालकाविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने फत्ते केली आहे. सणासुदीच्या काळात अशा प्रकारे शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई केल्यामुळे पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# परळी फोटोग्राफर क्रिकेट प्रीमियर लीग मध्यें छत्रपती संभाजीनगर अजिंक्य

**तभा वृत्तसेवा**

**बीड** | येथे आयोजित करण्यात आलेल्या फोटोग्राफर मैत्रीपूर्ण सामन्यातून दहा संघानी सहभाग नोंदवला होता बीड ,लातूर, अहमदपूर ,अंबाजोगाई, छ. संभाजीनगर व पुणे जिल्ह्यातून शिरूर, चाकण-आळंदी व खेड तसेच परळी येथील असोशियनचा संघ याप्रमाणे दहा संघानी यात सहभागी होऊन या सामन्याचा आनंद घेतला.



या सामन्यासाठी जेष्ठ फोटोग्राफर यशवंत चव्हाण ,हरिप्रसाद मोदाणी ,विठ्ठलराव झिलमेवाड, सुनील फुलारी यांच्या प्रमुख उपस्थितीत खेळाडू परिचय व नोणेफेक करून प्रत्येक सामन्याची सुरुवात करून देण्यात आली.बाद पद्धतीने व लकि ड्रा व्दारे ही स्पर्धा घेण्यात आली.यात विजेते ठरले ते छ.संभाजीनगर,उपविजेते परळी फोटोग्राफर असो .क्रिकेट टिम ,तृतीय क्रमांक चाकण -आळंदी तर चतुर्थ स्थान शिरूरला मिळाले. उत्कृष्ट फलंदाज कुणाल जोशी, उत्कृष्ट गोलंदाजी राम, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण तुषार पोतले यांना देण्यात आले.परळीतील आकाश गित्ते यांनी अर्धशतक व गोलंदाजी साठी त्यांना मिळालेले उत्कृष्ठ फलंदाज इतरांना देऊ केले. या साठी त्याचे खेळाडूवृत्ती दाखवून दिली.स्वताला मिळणारे पारितोषक परगावाहून आलेला मित्राला देवू केले, अतिशय खेळाडू वृत्ती दाखवली.

आयुष्यात अतिशय व्यस्त व कामाच्या ठिकाणी शारीरिक व मानसिक व्यापाला सामोरे जातांना येणारा थकवा व आजारपणाला दुर ठेवण्यासाठी विरंगुळा व आनंद निर्माण व्हावा,या करिता या खेळा सारखे सांघिक खेळ सातत्याने घेऊन ,ओळख चर्चा, सहभाग, स्नेहसंबंध निर्माण हा हेतू साध्य करण्यासाठी परळीतील फोटोग्राफर असोचे खेळाडू संतोष चव्हाण, आकाश गित्ते, झिलमेवाड बाळू, नागेश स्वामी, सिध्देश्वर वाघमारे,शिवा, महेश चव्हाण संयोजक या भुमेकेतून यशस्वी झाले. मोहन तिडके युट्यूब लाईव्ह, राजाराम तोरडमल व्हिडिओ कॅमेरा,व ड्रोन पायलट बाजिराव राठोड, यांनी सहकार्य केले.

चाकण सरपंच श्रीधर तापकिर, यशवंत चव्हाण, हरिप्रसाद मोदाणी, विठ्ठलराव झिलमेवाड,राम भाले यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यासाठी सुत्र संचलन सुनील फुलारी यांनी केले.समारोप प्रसंगी लातूरकर सतिश बरडे यांनी गुल्कोज बिस्कीट पुडे वाटप केले व स्नेह भोजनाचा आस्वाद घेत कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला.परळीतील बहुसंख्य छायाचित्रकार यांनी सहकार्य व सहभाग नोंदवला होता.

## पात्रुडमध्ये शिवरायांना रंजना आणि सुरेखा यादव यांची अनोखी मानवंदना



**तभा वृत्तसेवा**

**माजलगाव (प्रतिनिधी)** | माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथे शिवजयंतीचा उत्साह ओसंडून वाहत असतानाच, रंजना यादव आणि सुरेखा यादव या तरुणींनी आपल्या कलेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांना आगळीवेगळी मानवंदना दिली आहे. अत्यंत आकर्षक आणि जिवंत वाटणारी महाराजांची प्रतिकृती त्यांनी रांगोळीच्या माध्यमातून साकारली असून, परिसरातील नागरिकांकडून या दोघींच्या कलेचे मोठे कौतुक होत आहे.

अंजली किराणा आणि जनरल स्टोअर्सच्या समोर साकारण्यात आलेली ही भव्य रांगोळी पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. शिवजयंतीच्या निमित्ताने केवळ मिरवणुकांवर भर न देता, अशा प्रकारे सर्जनशील पद्धतीने महाराजांचा आदर व्यक्त करण्याचा या तरुणींचा प्रयत्न प्रेरणादायी ठरत आहे.

अत्यंत सूक्ष्म बारकाव्यांसह रेखाटलेली ही कलाकृती पात्रुड गावातील मुख्य आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. यादव भगिनींच्या या उपक्रमाचे संपूर्ण माजलगाव तालुक्यात कौतुक होत असून, सोशल मीडियावरही या रांगोळीचे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

## माजी आ.स्व.पटने यांचे समाजकारणाबरोबर पत्रकारितेत मोठे योगदान-शंकरअप्पा मोगरकर

श्रीमती वंदा पटने यांची सांत्वनपर भेट,जुन्या आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा**

**परळी (प्रतिनिधी)** | माजी आमदार स्व.गंगाधर पटने यांचे समाजकारण,राजकारण,वाचन संस्कृती बरोबरच जनक्रांती साप्ताहिकाच्या माध्यमातून पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य असल्याची संवेदना शंकरअप्पा मोगरकर यांनी व्यक्त केली.श्रीमती वंदा पटने यांची सांत्वनपर भेट घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

प्रसिद्ध समाजवादी नेते, शिक्षणतज्ञ,सहकार आणि ग्रंथालय चळवळीतील कृतिशील कार्यकर्ते. बिलोली मतदारसंघातून विधानसभेवर आणि विधान परिषदेवर प्रतिनिधीत्व करत आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे माजी आमदार गंगाधर पटने यांचे दि.११ जानेवारी रोजी निधन झाले.निवृत्त शिक्षक,जेष्ठ पत्रकार



शंकरअप्पा मोगरकर यांनी त्यांच्या पत्नी वंदा पटने या परळी येथील बुरकुले यांच्याकडे आपल्या माहेरी आल्या असता भेट घेत सांत्वन केले.ग्रंथालय चळवळीला बळ देत गावोगावी वाचनालय असावेत यासाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले. ते महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष होते आणि त्यांनी ग्रंथालय चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले.शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे स्व.आ.पटने यांनी बिलोली नगरपालिकेचे नगराध्यक्षपद भुषविले होते.याबरोबरच त्यांनी जनक्रांती या साप्ताहिकाचे प्रमुख संपादक म्हणून काम केलेले आहे. परळी नगरपरिषदेच्या शिक्षण सभापती पदी असताना येथील ग्रंथालयात पुस्तक भांडार वाढविण्यासाठी स्व. आ. पटणे यांनी मोलाची मदत केल्याची आठवण यावेळी मोगरकर सर यांनी व्यक्त केली. परळी शहरात गॅस एजन्सी सुरु करण्यासंदर्भात, मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वरांचे स्मारक उभे करण्यासाठी त्यांच्याशी संपर्क आला असल्याचे मोगरकर यांनी सांगितले.

## छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पारंपरिक पद्धतीने साजरी

**तभा वृत्तसेवा**

**केज प्रतिनिधी** | केज तालुक्यातील केकत सारणी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती यंदा अत्यंत पारंपारिक व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. गावकऱ्यांनी एकत्र येत कोणत्याही प्रकारचा कर्कश आवाज करणारा डॉल्बी न लावता ढोल-ताशे, लेझीम, टिपरे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढून एक आदर्श निर्माण केला.



सकाळी लवकर ग्रामस्थांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सजवलेल्या बैलगाडीतून महाराजांची प्रतिमा ठेवून गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक पोशाख परिधान केलेले युवक, लेझीम खेळणाऱ्या महिला व मुली, तसेच शिवकालीन वेशभूषेत सहभागी झालेले लहान मुले हे मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले. "जय भवानी, जय शिवाजी" च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

यावेळी आंबा साखर कारखान्याचे चेअरमन मा. रमेशरावजी आडकर साहेब व ऋषीकेश भैया आडसकर साहेब यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यांनी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेतील कार्याचा उल्लेख करून युवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. सामाजिक ऐक्य, शिस्त आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमात गावातील सर्व लहान मुले, महिला, पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तरुणांनी नियोजन, शिस्त व व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडत जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. विशेष म्हणजे, ध्वनीप्रदूषण टाळत पारंपरिक पद्धतीने सण साजरा करण्याचा घेतलेला निर्णय सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला.

## डॉ. राजकुमार राठोड यांच्या पुस्तकाचे सीसीआरटी उदयपूर येथे राष्ट्रीय स्तरावर प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**

**माजलगांव (प्रतिनिधी)** | महाराष्ट्र शासनाचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक, उच्चविद्याविभूषित संशोधक, लेखक तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय मास्टर ट्रेनर डॉ. राजकुमार राठोड यांच्या "बीड जि. प. नासा व इस्रो शैक्षणिक सहल निवड परीक्षा सरावसंच" या पुस्तकाचा राष्ट्रीय स्तरावरील प्रकाशन सोहळा सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकारच्या सांस्कृतिक स्रोत एवं प्रशिक्षण केंद्र (सीसीआरटी), उदयपूर (राजस्थान) येथे अत्यंत मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या पुस्तकाचे प्रकाशन मा. श्री अभिक सरकार (क्षेत्रीय अधिकारी, सीसीआरटी उदयपूर), प्रो. डॉ. हितेश पानेरी (सीसीआरटी, उदयपूर), डॉ. जयप्रकाश



शाकद्विपीय (हिंदी राजभाषा विशेषज्ञ, राजस्थान), एच. एस. बीस्ट (उत्तराखंड) तसेच साब्यासाची दास (तेलंगणा) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या पुस्तकाचे प्रकाशक आराध्या पब्लिकेशन, माजलगांव, जिल्हा बीड (महाराष्ट्र) आहेत. रेणुकाई ग्राफिक्स यांनी मुखपृष्ठ तयार केले. या राष्ट्रीय प्रकाशन सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून डॉ. सुनीता लहाने, शंतनू खरवडे, हरिभाऊ सुतार, अमृता भुमरे, चंद्रकन्या सारसेकर, प्रतिभा साबळे, जोत्स्ना पवार, अर्जुन कुचेकर आदी शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते. तसेच देशातील १३ राज्यांतून आलेले प्रतिनिधी या कार्यक्रमास उपस्थित राहून डॉ. राठोड यांच्या कार्याचा गौरव केला.

# ९ महिन्यांपूर्वी गहाळ झालेली दुचाकी पोलीसांनी शोध घेवुन मूळ मालकाला केली सुपुर्त

तभा वृत्तसेवा

**माजलगाव / प्रतिनिधी** |

पोलीस स्टेशन माजलगाव शहर हद्दीत मागील सहा महिन्यांपूर्वी शिवाजी महाराज चौक बस स्थानका समोर दृष्टी ऑप्टिकल समोरुन सि.बी शाईन नावाची मोटर सायकल महा २३ ए एम ७७१० दि.०८ मे २०२५ रोजी रात्री १२:४५ वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली होती.

ऑप्टिकल मधिल कामगार मुलगा बाहेर गावाहून रात्री उशिरा माजलगाव शहरांमध्ये परतल्यामुळे मुक्कामा साठी दृष्टी ऑप्टिकल समोर मोटर सायकल लाऊन तो ऑप्टिकल मध्ये झोपायला गेला असता रात्री १२:४५ च्या सुमारास बिना नंबर ची चार चाकी गाडी मधुन येऊन शिवाजी महाराज चौक बाजार रोड येथे गाडी उभी केली आणी चार चाकी गाडी मधुन दोन चोरटे आरोपी उतरले दृष्टी ऑप्टिकल समोर उभी असलेली सि.बी शाईन मोटर सायकल चे हँडल लॉक टोडले आणि गाडी डायरेक्ट



करुन लंपास केल्याची घटना घडली होती.

त्या वरुन सदर मोटर सायकल गहाळ झाल्याची तक्रारी पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे दाखल झाली होती. तसेच आज कालच्या धावपळीच्या युगामध्ये मोटर सायकल हि जिवणामधे आवश्यक झाली आहे. त्यामुळे मोटर सायकल ही प्रत्यकासाठी महत्वाची आणि गरजेचा विषय ठरलेली आहे. त्यामुळे सदर गहाळ झालेली मोटर सायकल शोध कामी पो.स्टे. स्तरावर विशेष पथकाची नेमणुक करुन मोटर सायकल चा शोध घेवुन संबंधित तक्रारदार व वाहन मालक डॉ.गणेश मस्के यांना गाडी सुपुर्त करुन चावी देतांना माजलगाव शहर पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोह/ रामेश्वर खेत्रे, पत्रकार अजिंक्य वाघमारे उपस्थित होते. काल दि.१९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनी माजलगाव शहर पोलिस स्टेशन येथे वाहन मालकाला मोटर सायकल परत केली असुन त्या बाबत डॉ.गणेश मस्के यांनी माजलगाव शहर पोलीसांचे आभार व्यक्त करुन समाधान व्यक्त केले आहे. सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री.नवनित क़ॉवत, मा.अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके, उपविभागीय अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोह/1796 रामेश्वर खेत्रे, यांनी केलेली आहे.

## किल्ले धारूर नगरपरिषद च्या कर्मचाऱ्यांनी जपली शिवरायांची 'रयत भक्ती'

मतिमंद विद्यालयात गुलाल नव्हे, तर मायेचा घास वाटला!



**किल्ले धारूर** | ज्या राजाने अठरापगड जातीच्या रयतेवर पोटच्या पोरासारखं प्रेम केलं, त्या छत्रपती शिवरायांची जयंती म्हणजे केवळ ढोल-ताशांचा गजर नव्हे, तर वंचितांच्या डोळ्यांतील आसवं पुसणे होय. हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून धारूर नगरपरिषद कर्मचारी संघटनेने यंदाची शिवजयंती मोठ्या आगळयावेगळ्या आणि माणुसकीच्या पद्धतीने साजरी केली. शहरातील 'निवासी मतिमंद विद्यालया'त जाऊन या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवत त्यांना अल्पोपहाराचे वाटप केले.

नेहमी फाईलींच्या गराड्यात आणि प्रशासकीय कामात व्यस्त असणारे नगरपरिषदेचे कर्मचारी आज एका वेगळ्याच भूमिकेत दिसले. शिवजयंतीचे औचित्य साधून या सर्व कर्मचाऱ्यांनी मतिमंद शाळेला भेट दिली. यावेळी घरातील मोठ्या भावाप्रमाणे या कर्मचाऱ्यांनी शाळेतील विशेष मुलांशी संवाद साधला. त्यांच्यासाठी आणलेला खाऊ आणि अल्पोपहार पाहून मुलांच्या चेहऱ्यावर जे हसू उमलले, तीच खरी शिवरायांना दिलेली मानवंदना असल्याची भावना यावेळी व्यक्त झाली.

आजकाल शिवजयंती म्हटलं की मोठ्या मिरवणुका आणि आवाज येतो, पण धारूर नगरपरिषद कर्मचारी संघटनेने शांततेत आणि संयमाने सामाजिक बांधिलकी जपली. केवळ घोषणा न देता प्रत्यक्ष कृतीतून शिवराय कसे जपावे, हे या कर्मचाऱ्यांनी दाखवून दिले. शाळेतील शिक्षकांनीही नगरपरिषदेच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. "प्रशासनात काम करणारी माणसं एवढी संवेदनशील असू शकतात, हे पाहून आनंद झाला," अशा शब्दांत शिक्षकांनी कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी कर्मचारी संघटनेच्या वतीने सांगण्यात आले की, "शिवराय हे आमचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी दीन-दलितांची सेवा करायला शिकवले. त्यामुळेच केवळ जयंतीच्या दिवशीच नव्हे, तर यापुढेही वेळोवेळी अशा सामाजिक संस्थांना मदत करण्याचा आणि जनहिताचे उपक्रम राबवण्याचा आम्ही निर्धार केला आहे."

या कार्यक्रमाला नगरपरिषदेचे सर्व विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोणत्याही राजकीय डामडौलापेक्षा 'माणुसकीचा सोहळा' म्हणून या उपक्रमाची चर्चा आज संपूर्ण धारूर शहरात होत आहे.

# दीनदयाल शोध संस्थान बीड द्वारा नानाजी देशमुख विद्यामंदिर व गोकुळ शिशु वाटिकेचे स्नेहसंमेलन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**बीड** | दीनदयाल शोध संस्थान संचलित गेली 35 वर्षापासून सुरू असलेली गोकुळ शिशु वाटिका आणि 8 वर्षापासून सुरू असलेले नानाजी देशमुख विद्यामंदिर यांच्या वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे संपन्न झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष आणि भारतीय सांस्कृतिक वारसा या मुख्य संकल्पनेवर (थीम) आधारित या कार्यक्रमात चिमुकल्यांनी सादर केलेल्या 'भारतीय सांस्कृतिक दर्शनाने' प्रेक्षकांची मने जिंकली



कार्यक्रमात काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंतच्या विविध राज्यांच्या गीतांचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्राचे गौरव गीत, गुजरातमधील चैतन्यमयी गरबा, पंजाबचा जल्लोषपूर्ण भांगडा आणि राजस्थानच्या वीरभूमीचे लोकसंगीत सादर झाले. काश्मीर, बिहार, आसाम, आंध्रप्रदेश आणि बंगाली संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या बहारदार गीतांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले.

विशेष आकर्षण ठरले ते अडीच-तीन वर्षांच्या चिमुकल्यांचे सादरीकरण, ज्यांच्या लयबद्ध हालचालींनी उपस्थित पालकांना आणि पाहुण्यांना अचंबित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. अर्चनाताई तुंगार होत्या. शालेय समिती सचिव डॉ सीमाताई जोशी, समिती सदस्य श्री एस एन.कुलकर्णी,श्री रवींद्रजी देशमुख,श्री गोरक्षनाथ अबूज, अनिता ताई वजूरकर,स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. जे. बी. कुलकर्णी, श्री. दीपक मुळे, डॉ. मधुराताई कुलकर्णी, श्रीमती सुनंदा ताई कुलकर्णी आणि जन शिक्षण संस्थानचे संचालक श्री. गंगाधरजी देशमुख यांची उपस्थिती होती.